# श्री साईलीला

सप्टेंबर १९६३

★

किं. ५० न. पैसे



शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक

स्थापना १९१६



साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २ टे. नं. २९६३१



# श्री साई वाक्सुधा

एखादा माणूस कृपाळू झाला तरी तो तुम्हांला देऊन किती देणार ? आणि ते दुसऱ्यानें दिलेलें तुम्हांला किती दिवस पुरणार ? भक्तिभावानें देवाला प्रसन्न करून घ्या. तो जे देईल ते अमाप देईल. आणि ते कधींहि संपणार नाहीं. त्याची कृपा मात्र झाली पाहिजे व तुम्हींहि त्याच्या कृपेस पात्र झाले पाहिजे. देव घ्या घ्या म्हणून तुमच्या मागे लागला आहे; परंतु त्याच्याकडे तुमचे लक्ष आहे कुठे ? देवाचा खजिना ओतप्रोत भरलेला आहे. तो ओतून चालला आहे. तुम्ही खणण्याची व गाड्या आणून तो भरून नेण्याचीच खोटी आहे. जो खरा माईचा पूत असेल तोच हें जाणेल व खजिन्याच्या प्राप्तीसाठीं खणायला लागेल ! ही वेळ परत येणार नाही. ती साधा व आपले भांडार भरून घ्या हेच माझ्या भक्तांना माझें सांगणें आहे.

— श्रीसाईसच्चरित्


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४२ वे ] सप्टेंबर १९६३ [ अंक ६ वा

: संपादक :

श्री. श्रीपाद बाळकृष्ण दर्पे

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ६३३६१

: कार्यालय :

'साई निकेतन,' डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०४-

बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

'आधीं पोटोबा आणि मग विठोबा ' ही रोजच्या व्यवहारातील अगदीं साधीसुधी म्हण आहे, परंतु रोजच्या व्यवहारात तिचा आचार जसा कटाक्षपूर्वक व्हायला पाहिजे तसा मात्र होत असलेला आढळून येत नाहीं. देहाला उपासतापास करून कष्टविलें म्हणजे देव प्रसन्न होईल अशी पुष्कळांची कल्पना असते. कष्टाशिवाय काही साध्य होत नाही हें तर खरेंच; माणसाने जास्तीत जास्त उद्योग करावा, एक क्षणही वाया दवडू नये, जर धनदौलत किंवा ज्ञान संपादन करावयाचे असेल तर शरिराला जरूर कष्ट द्यावे; परंतु आपल्या जीवात्म्याला भुकेमुळे कधींही कष्ट देऊ नयेत. अन्नमय प्राण म्हटलें आहे तें उगाच नाहीं. मन नेहमी संतुष्ट व आनंदी असलें पाहिजे. तरच देव आठवतो. त्याचें स्मरण होऊन त्याची भक्तीही घडते.

बाबानीं अगदी स्पष्ट भाषेंत सांगून टाकिले आहे की, ' जया मनी देव गवसावा। भाकरतुकडा आधीं खावा। असल्यावीण समाधान जीवा। कैसेनि देवा उमगावें। भुकेल्या पोटी देव सापडे। हें तों कल्पांतीही न घडे। उपासतापास याचें साकडें। चालेना इकडे साईंसी ॥

बाबाचा देवभक्तीचा मार्ग हा असा आहे. बाबानीं सांगितलेला हा मार्ग कितीं सुस्पष्ट व सोपा आहे बरें ! परंतु तो मार्ग सोडून जिवाला ताप व कष्ट देण्याचा मार्ग अनेकांकडून अज्ञानामुळें स्वीकारला जातो. देहाला कष्ट दिले, देह तागविला म्हणजे देवाला साकडें पडेल व मग देव पावेल. अशी कित्येकाची भोळी व वेडी समजूत असते, परंतु बाबानी तिच्यावर प्रहार केलेला आहे. ती तापदायी शिकवणूक त्यांनीं खोडून काढिली आहे.

आपली सर्व इंद्रियें शाबूत पाहिजेत. देहाचें जरूर तें पोषण झालें पाहिजे. व होत राहिले पाहिजे. बाबा स्वतः कधीं उपाशी रहात नसत. देहाचे सर्व व्यवहार नीट, सुरळीत चालले पाहिजेत. मनात समाधान वास करीत असलें पाहिजे. उपोषण करणाऱ्याचें चित्त स्वस्थ राहणें कठीण असते. मनाला स्वस्थता पाहिजे. जरूर तेवढा आराम पाहिजे, तरच राम आठवतो. ' देव न लाधे रित्या पोटीं। आधी आत्म्याची करा संतुष्टी।' हें बाबाचे वचन त्रिवार सत्य आहे. त्याचें आचरण व अनुकरण करण्यासाठीं प्रत्येकानें झटलें पाहिजे.

दुपारची वेळ भागविलीच पाहिजे. स्वतःची तशीच इतराचीहि ! दुपारच्या वेळी कोणीं दारी आला किंवा उपाशी तडफडणारा माणूस कोठेंहि भेटला तर त्याची भूक जरूर शांत करावी. त्यात मोठें पुण्य आहे म्हणतात तें उगाच नाही. ' भुकेल्या भाकर आधीं द्यावी. ' असें बाबांनीं वेळोवेळीं सांगितलें आहे नाहीं का ?

'पोटीं नसता अन्नाचा गोळा। देव कवण्या डोळा पहावा। कवण्या वाचे महिमा वर्णावा। कर्णें परिसावा तो कवण्या ? असा बाबांचा सरळ सवाल आहे.

हें अन्न प्राणाचें तत्वज्ञान स्वतः आचरणात आणून इतराकडूनहि त्याचें आचरण घडावें यासाठी बाबा परोपरीनें झटत असत. जरूरीपुरतेंच खावें. खाण्यांत अतिरेक कधींहि क नये. जरूरीपुरते बोलणे व जरूरींपुरतें खाणें. अर्थात मितभाषी व मिताहारी रहाणें हे तत्व आपल्या अंगी पूर्णपणे बिंबले पाहिजे. अघळपघळ बोलणें व अघळपघळ किंवा अतिरेकी खाणें हें अत्यंत हानीकारक आहे. ही दोन तत्वें मनावर बिंबवून जो वागेल तोच आपलें जीवन सुखाचें व समाधानाचें करील.

एकदा एका गावाहून एक बाई बाबाच्या दर्शनासाठीं आली. तिच्या मनात बाबा प्रसन्न करून घ्यावयाचे होते. जग रहाटीप्रमाणें किंवा सर्वसाधारण समजुतीप्रमाणें तिच्या मनाने घेतलें की, आपण बाबाच्या दर्शनार्थ गेलों असतां तेथें तीन दिवस उपोषण करून देह कष्टवावा म्हणजे बाबा संतुष्ट होतील व आपणास पावतील !

ती बाई ठरल्याप्रमाणें शिरडीस केळकर नावाच्या गृहस्थाकडे एक ओळखपत्र घेऊन आली. बाबाच्या पायाशी बसून बाबाचे नामस्मरण, उपोषण ह्या दोन्ही क्रिया एकदम आचरणांत आणावयाच्या हें होतें तिचें मनोगत; परंतु बाबा मनोगत ओळखणारे ! त्यामुळें शिरडीत येताच तें तिचें मनोगत तिच्या जवळ राहिले व प्रत्यक्षात जें घडलें तें वेगळेंच !

बाई आल्या तो दिवस होता शिमग्याच्या सणाचा. केळकराच्या घरीं मुलें-बाळें होतीं. आणि घर मालकीण तिन दिवसाची रजा घेऊन बसली होती ! त्याच्या घरीं त्या बाई आल्या व आणलें गाडोडें त्याच्या घरीं ठेऊन व बरोबर आणलेलें ओळखपत्र त्याना देऊन त्या साईबाबाच्या दर्शनासाठी द्वारकामाईत गेल्या.

वर सांगितल्याप्रमाणें बाबानीं बाईचें मनोगत ओळखलें होतेंच. बाई नमस्कार करून बसताच बाबा त्याना म्हणाले, उपासतापास काय करायचे आहेत आपल्याला ! अन्न म्हणजे परमेश्वर व माणूसही परमेश्वर स्वरूप ! दोघाची ताटातूट करून कस बरं चालेल ! अन्न पाणी जीव जगविण्यासाठी व तो आनंदात रहाण्यासाठीं अत्यावश्यक आहे. त्याचा अव्हेर करून कस बरं चालेल ! योग्य वेळीं, योग्य प्रमाणात त्याचा आदर आपण केलाच पाहिजे. तेव्हा तुम्ही ज्या दादा केळकराच्या घरीं उतरला आहात. त्याच्या घरी जा. त्याच्या घरी अडचण आहे. आज आहे शिमग्याचा सण. आज पुरणपोळ्या करा. त्याच्या मुलाबाळाना त्या खाऊं घाला व घरातील मंडळीबरोबर तुम्हीही पोटभर पोळ्या खा. त्यामुळें लहान थोरास आनंदी आनंद होईल. जेथें आनंद आहे तेथे देव आहे, जेथें शांतता व समाधान आहे, तेथें देव आहे. जेथें पोटभरल्यामुळें प्रफुल्लता अवतरली आहे तेथें प्रत्यक्ष भगवंत अवतरला आहे म्हणून समजा ! आनंदाच्या दिवसांत उपासतापासाचा व कष्टाचा मार्ग स्वीकारून का देव पावणार आहे ?

हे अन्नाचें तत्त्वज्ञान ऐकून बाईला धक्काच बसला ! कारण काय ? बाबानीं बाईचें मनोगत दृष्टिभेट होताच कसे ओळखले ? आणि ते ओळखून बाबानीं भेट होताच भ्रमनिरास केला !

बाईच्या डोक्यात एक प्रकाश पडला. त्याना आपली चूक समजून आली. ती दुरूस्त करायची म्हणजे बाबाची आज्ञा पालन करायची. येथे दु मार्गच नव्हता बोलण्यासारखे किंवा शंका विचारण्यासारखे काही शिल्लकच राहि न व्हते.

मग बाईनीं काय केले ? त्या बाबाना नमस्कार करून तेथून उठल्या आणि केळकरांच्या घरी गेल्या व स्वयंपाकास लागल्या. मोठ्या आनंदाने व उत्साहानें त्यानीं पुरणपोळीचें जेवण केलें. बाबाना नैवेद्य दाखविला. तो त्याना पोहोचता केला व घरांतील मुलाबाळासह बाईनी व सर्वानीं तो सणाचा दिवस समाधानपूर्वक साजरा केला.

केवढे थोर त्या बाईचें भाग्य ! तसेंच भाग्य तुमच्या आमच्या व सर्वांच्या वाट्यास येवो हीच श्री साईचरणीं अनन्यभावें प्रार्थना !

—संपादक

---


## जनतेचे आरोग्य म्हणजेच राष्ट्राचे सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान बनविण्यासाठी बलवान बना**:–यासाठी लागणारी हरेक तऱ्हेची उपकरणे म्हणजे डंबेल्स्, लेझीम, मुगदुल, यासारखा सर्वश्रेष्ठ व उत्तम तऱ्हेचा माल बनविण्यात येतो.

आम्ही कांदिवली टिचर्स ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, डि. स्कूल बोर्ड, जिल्हा परिषद, नगरपालिका, ग्रामपंचायती, व्यायामशाळा, विकास केंद्रे, याना माल पुरवितो. अधिक माहिती आणि कॅटलॉगसाठी लिहा:...



# स्वामी रामदास यांचें परलोकीं प्रयाण

**गेल्या महिन्याच्या अंकी सर्वपरिचीत सत्पुरुष स्वामीशिवानंद यांनी या जगाचा निरोप घेतल्याची दुःखद वार्ता वाचकांस निवेदन करावी लागली. त्यांच्या मागोमाग भारतांतील कान्हनगड निवासी दुसरे सत्पुरुष स्वामी रामदास यांनी ता. २५ जुलै रोजीं वयाच्या ७९ व्या वर्षी परलोकी प्रयाण केल्याची दुःखद वार्ता येथें मोठ्या कष्टानें नमूद करावी लागत आहे. स्वामीजींनी आत्मचरित्रपर चार ग्रंथ इंग्रजीत लिहिले असून त्यांपैकी In the Vision of God या ग्रंथांतील त्यांच्या जीवनासंबंधी एका प्रसंगाचें पुढील भाषांतर श्री. द. पां. खांबेटे यांनी केलें असून तें मार्मिकवरून साभार येथें देण्यांत येत आहेः—**

स्वामी रामदास यांचे आत्मचरित्रपर असे एकुण चार ग्रंथ आहेत—In Quest of God, In the Vision of God, Call of the Devotee आणि World is God. यांतील पहिल्या तीन पुस्तकात त्यांनीं भारतात केलेल्या परिभ्रमणाचा वृत्तात आहे आणि चौथ्या ग्रंथांत त्यानीं केलेल्या जगाच्या प्रवासाची हकीगत आहे.

In the Vision of God या ग्रंथात वर्णन केलेला एक प्रसंग येथें अनुवादित करून देत आहे. स्वामी रामदास स्वतःतंबधीं बोलतांना 'मी' असा प्रथमपुरुषी उल्लेख कधींच करीत नसत. 'रामदास' असा तृतीय पुरुषीं उल्लेखच नेहमी करीत असत. प्रस्तुत अनुवादकानें त्याना याचें कारण एकदा विचारलें होतें. त्यावर ते हंसून म्हणाले होते —

"कारण ? कारण रामाला ठाऊक ! एकदा सकाळीं रामदास उठला आणि त्याला 'मी' हरवला असल्याचें आढळलें ! आणि हरवला तो कायमचाच !"

स्वामी रामदास एकदा आगगाडीनें चित्रकूटला जायला निघाले होते. त्यावेळीं एका बनियानें त्याना आपण होऊन सोबत केली. त्या बनियाबरोबरच्या सहवासात घडलेली हकीकत सागताना स्वामी रामदास म्हणतात —

## एका बनियाचें वैराग्य

आगगाडी स्टेशनमधून बाहेर निघाली. त्या बनियापाशीं एक काबळे आणि

एक लोटा होता. त्याने तें कांबळे एका बाकावर पसरले आणि रामदासाला आग्रह करून त्या कांबळ्यावर पडायला लावले. रामदासाचे पाय चेपीत बनिया म्हणाला,

"महाराज! मलाहि संसाराचा अगदी वीट आला आहे. मी देखील साधु होईन म्हणतो. चिंता आणि दुःख यानी बुजबुजलेल्या संसाराकडे मी आता कायमची पाठ फिरवली आहे. तुम्ही मला आपला शिष्य समजा आणि अभय द्या.

रामदास म्हणाला,

"रामजी! संसार असला म्हणून काही बिघडत नाही. सखेमिरा लागलेला असतो तो तुमच्या मनाला. तुमच्या अंतर्गतच असलेल्या उत्पातग भ्रमाच आवरण पडलेलं असत. ते फाडून दूर करण्याची बलवत्तर तळमळ अंतःकरणातील अंतःकरणात आधी निर्माण व्हावी लागते. ही तळमळ जोवर उत्पन्न झाली नाही, तोवर नुसत बाह्य वैराग्य हे निष्फळ ठरत. यामुळे तुझी केवळ आगीतून निघून फुफाट्यात पडल्यागत अवस्था होईल. जीवन आणि संसार याच्याकडे पाहाण्याची आपली वृत्ति यथायोग्य असेल तर आपल्याला जीवनात सुख मिळेल. योग्य वृत्ति ही योग्य दृष्टिकोणावर अवलंबून आहे. ही दृष्टि सत्य किंवा परमेश्वर यान्चा साक्षात्काराने प्राप्त होते. उगाच स्वतःची फसवणूक करून घेऊ नकोस. केवळ संसाराकडे पाठ फिरवली म्हणजे मुक्ति आणि शांति तुझ्यापुढें हात जोडून उभ्या राहाणार नाहीत. आपलं मन आधी नीट ओळख. मुक्ति आणि आनंद ही तुझ्या अंतरंगातच आहेत. त्यासाठी काम, क्रोध आणि लोभ याच्यावर विजय मिळवण, हा पहिला मार्ग आहे. रामदासाला उगाच चिकटूं नको. रामदास कोणी गुरु नव्हे. तो तुला फक्त मार्ग दाखवूं शकेल. पण प्रयत्न आणि प्रयास हे तुला स्वतःलाच करायला हवेत. तुला शिष्यत्वच पत्करायच असल तर तूं सत्याचाच शिष्य हो."

बनियाचे मन कुठेतरी गुंतलेले दिसत होते. रामदासाच्या शब्दावर त्याने काही उत्तर दिलें नाही, किंवा रामदासाचें म्हणणें समजल्याचें काही चिन्हहि त्याच्या मुद्रेवर दिसले नाही.

## साधना करतोस का?

रात्र संपली. पहाटेला गाडी चित्रकूट स्टेशनावर आली. खाली उतरून रामदास आणि बनिया चित्रकूट स्टेशनपासून तीनएक मैलावर असलेल्या डोंगराकडे निघाले.

वाटेत रामदासानें बनियाला म्हटले,

"रामजी! मन एकाग्र करण्यासाठी तूं काहीं साधना करतोस की नाही?"

"तर!" बनिया म्हणाला, "मी अधून मधून देवाचं नाव घेत असतो."

"अधूनमधून उपयोगाचं नाहीं. नामाचा जप अखंड चालू ठेवला पाहिजे. आणि आपल्या अंतःकरणात नामस्मरणाचा ओघ सतत राहिला पाहिजे."

बनिया चटकन् म्हणाला,

" त्याची काळजी नको. ते सगळं मी बरोबर करतो आहे. "

रामदास परत म्हणाला,

" रामजी तूं रामदासाला सोड. तू आपले स्वतःच जीवन स्वतंत्रपणें जग. रामदास सारखा एकटा भटकत असतो. "

" नाही ! नाहीं ! " बनिया आवेगानें उद्गारला,

" मी तुम्हाला सोडणार नाही. "

रामदास यावर म्हणाला,

" रामदासाने जो मार्ग पत्करलेला आहे. तो यातनानी आणि धोक्यांनी भरलेला आहे. रामदास स्वतः निर्भय आहे आणि त्याला मृत्यूच भय वाटत नाहीं. त्याच्यामागून तू निघालास तर तुला अतिशय कष्ट आणि दुःखं सहन करावी लागतील."

बनिया निश्चयाच्या स्वरात म्हणाला,

" मलाही कशाच भय वाटत नाही. तुम्ही जें जीवन जगणार त्याला अनुरूप वर्तन ठेवण्याची माझ्यात शक्ती आहे. आता यापुढ तुमच्याबरोबरच राह्यच असा माझा पक्का निर्धार झाला आहे."

त्याचें म्हणणें कबूल करण्याखेरीज यावर रामदासाला दुसरा पर्यायच नव्हता. देवाचीच तीं इच्छा होती.

**न्हाव्याचा नकार**

शहराच्या मध्यभागातून वाहाणाऱ्या मंदाकिनी नदीच्या तीरावर ते आले. स्नानाच्या घाटावर असलेल्या एका जीर्ण बांकड्यावर रामदासानें आसन ठोकलें. बनियाला जी वैराग्याची लहर आली होती तिच्या तिरिमिरीत त्यानें आपल्या अंगांतला सदरा काढला आणि तिथून जाणाऱ्या एका न्हाव्याला हाक मारून तो घाटाच्या पायरीवर बसला.

न्हाव्याला तो म्हणाला,

" माझं साफ मुंडण कर बधूं ! मला सन्यास घ्यावयाचा आहे. "

न्हावी उत्तरला,

तुमचा माझ्याबद्दल गैरसमजूत झालेली दिसते आहे. सन्यास घेण्यांत तुम्हांला मदत करायची आणि तुमच्या बायकामुलांचे शिव्याशाप डोक्यावर घ्यायचे, हें कुणी सांगितलं आहे ? आपली याला तयारी नाही. "

" अरे भाई, " बनिया उद्गारला " तुला कशाला हवी ती पचाईत ? तूं आपला मी सागतो तस कर. हे बघ ? तुझा जो काहीं हजामतीचा दर असेल

तो देऊन आणखी वर हा माझा शर्ट आणि हें वळ्याळ मी तुला देईन. मग तर झालं! चल आटप."

पण न्हाव्याचा नकार कायमच होता. इतर कोणत्याहि लाभाच्या विचारांपेक्षां त्या बनियाच्या बायकामुलांच्या शिव्याशापाचे भय त्याला अधिक वाटत होतें. त्याने त्या मोहाला बळी पडण्याचें नाकारलें. तो उठून चालायला लागणार इतक्यांत बनिया त्याचा हात पकडून अजीजीनें म्हणाला,

"हें बघ. तूं असं कर—माझी संपूर्ण दाढी कर. भिवया तेवढ्या ठेव. डोक्यावरचे सगळे केस साफ काढ. पण फक्त बोटभर बारीकशी शेंडी ठेव. आतां तर तुझी कांहीं हरकत नाहीं ना ?"

या तडजोडीला तयार होऊन न्हावी थांबला आणि आपली धोपटी जमिनीवर ठेवून खालीं बसला. पंधरा मिनिटात बनियाचे तोंड आणि डोकें गुळगुळीत झालें. डोक्यावर मध्यभागी फक्त आंखूड शेंडीचा छोटासा झुबका तेवढा उरला. बनियानें न्हाव्याला आपला शर्ट, घड्याळ आणि थोडे पैसे दिले. एवढें केल्यावर तो रामदासाकडे वळला. रामदासाच्या मुद्रेवर आपल्याबद्दल कौतुकाचा भाव दिसणार अशी त्याची अपेक्षा होती. रामदास त्या सगळ्या नाटकाकडे प्रसन्नतेनें पहात बसला होता.

आपली मळकट टोपी बनियाने फेकून दिली. त्याच्याजवळ दोन धोतरें आणि पैशाची पिशवी होती, एक धोतर त्याने भिकाऱ्याला देऊन टाकलें. आता त्याच्याजवळची सगळी मालमत्ता म्हणजे एक धोतर एक सोन्याची आंगठी, थोडे पैसे आणखी एक लोटा एवढी उरली.

स्नान केल्यावर तो रामदासाला घेऊन एका मिठाईच्या दुकानांत गेला तिथें दूध आणि पुरी यांचा त्यांनीं फराळ केला.

रात्री रामदासाने एका झाडाखालीं मुक्काम ठेवला. बनिया तिथेंच रामदासाजवळ झोंपला. तो रामदासाबरोबर एखाद्या छायेसारखा वावरत होता. रामदास कोणत्याहि क्षणीं आपल्या हातावर तुरी देऊन जाईल अशी त्याला भीति वाटत होती. सकाळीं तृणाच्छादित भूमीच्या आपल्या बिछान्यावरून बनिया उठला, तेव्हां आपल्या हातून कांहीं तरी चुकलें आहे असे त्याला वाटू लागलें होते. तो रामदासाला म्हणाला,

"आपण कार्वी स्टेशनकडे जाऊया. इथून तें स्टेशन फक्त चार मैल दूर आहे. संध्याकाळीं आपण परत येऊं."

कां ? हें विचारायचें रामदासाचें काम नव्हतें. संमति देणे एवढेच त्याचे काम होतें. त्या मोह घालणाऱ्या मिठाईच्या दुकानाला त्यांनी भेट दिली आणि ते पुढें निघाले. वाटेत एका टेकडीवरच्या अरुंद वाटेनें जात असतांना रामदासाला त्या बनियाच्या तोंडून एक हुंदका आणि मागोमाग विव्हळणें, याचा आवाज आला. रामदास दचकून एकदम त्या बनियासमोर उभा राहिला. बनिया अश्रू ढाळीत थांबला होता.

रामदास म्हणाला,

" का ? काय झाल ? "

डोळे पुशीत आणि एकामागून एक हुंदके देत बनिया म्हणाला,

" माझी बायको आणि मुल याच्याविषयी माझ्या मनात एकदम कळवळा दाटून आला. त्याना नकळत मी घर सोडून पळून आलों आहे. त्याना माझी सारखी आठवण येत असेल आणि मी तिथें नसल्यामुळें त्याना किती दुःख होत असेल ! मला माझ्याबद्दल काहीं वाटत नाही. पण त्याच्यासाठी मात्र माझा जीव तिळतिळ तुटतो हो. "

असें बोलता बोलता त्याला रडू कोसळलें.

रामदास म्हणाला,

" रामजी ! अरे मग तूं घरीं परत का जात नाहींस ? "

" त्याच असं आहे–" बनिया म्हणाला, " त्याच अस आहे–मी आपल्याच हातानं मागचे दोर कापून टाकल्यासारखं केल आहे. छेः ! तो म्हावी म्हणत होता तें खरं आहे–" डोक्यावरची छोटी शेंडी अत्यंत हळुवारपणे गोंजारीत तो पुढें म्हणाला, " हाऽ ! अजूनहि परिस्थिति अगदींच काही वाईट झालेली नाहीं. अजूनसुद्धा त्याच्याकडे मला परत जातां येईल म्हणा. "

## शांतता–काजांत अपयश

दोघे कावींला येऊन पोंचलें. रेल्वेस्टेशनजीक असलेल्या एका घराच्या अंगणात तो बनिया सरळ गेला. अगणांत एका बाकावर दोघेहि बसलें. दोन मुलगे अंगणात खेळत होते. त्या मुलाना बनियानें अनेकदा खुणा केल्या. पण त्यानी त्याला ओळखलें नाहीं. किंवा त्याच्याकडे लक्षहि दिलें नाहीं. त्याच्या रंगरूपात बदल झाल्यामुळें त्या मुलांना त्याची ओळख पटली नाही.

नंतर त्यानें त्यातल्या एका मुलाला जवळ बोलावले आणि त्याच्या कानात सांगितलें,

" तुझ्या आईला जाऊन साग की एक गृहस्थ तिला भेटायला आला आहे."

तो मुलगा घरात गेला. बनियानें आपल्या कामगिरीचें गुपित रामदासाला सांगितलें. बनिया आपल्या मेहुणीच्या–आपल्या पत्नीच्या बहिणीच्या घरीं आला होता. तिला आपल्या आगमनाची वार्ता देऊन तिच्यामार्फत आपल्या पत्नीशीं स्वतःची दिलजमाई घडवून आणण्याचा त्याचा मानस होता. त्याचें बायकोबरोबर कडाक्याचें भांडण झालें होतें आणि ' पुन्हा या घराच्या पायरीवर माझी सावलीसुद्धा पडू देणार नाहीं ! ' अशी धमकी घालून त्यानें घर सोडले होतें.

तो मुलगा घरातून परत बाहेर आला आणि काहीं न बोलता सवरता आपल्या भावाशी पुन्हां खेळूं लागला. घरातली गृहिणी कोणा अपरिचित इसमाबरोबर कशी बोलेल ? पुन्हा तो त्या मुलाजवळ गेला आणि त्याला हळूच म्हणाला,

"तुझ्या आईला सांग कीं तिच्या बहिणीचे-तुझ्या मावशीचे यजमान आले आहेत."

त्या मुलाने डोळे विस्फारून त्याच्याकडे पाहिले आणि नतर त्याच्या गुबगुबीत मुद्रेवर हास्य पसरले. तो पुन्हा घरात पळत गेला आणि थोड्याच वेळात बाहेर येऊन त्यानें त्या बनियाला घरात बोलावले.

प्रसन्न मुखानें तुरतुर चालत बनिया घरात शिरला. रामदास वाट पहात बसून राहिला. पंधराएक मिनिटें गेली—आणि बनिया बाहेर आला.

चाबकानें फोडून काढलेल्या कुत्र्यासारखा तो आता दिसत होता. त्याच्या मेहुणीने त्याला काय सुनावले असेल, याची साक्ष त्याची कडवट मुद्रा देत होती. तिने त्याची सणसणीत कानउघाडणी केली असली पाहिजे. तिच्या जिभेच्या पट्टयाच्या वारांनी त्याचा चेहरा काळानिळा पडला होता, सुरकुतून गेला होता !

"तिच्या जिभेला वस्तऱ्यासारखी धार आहे हो ! खरोखरी चाबकाची जीभ म्हणजे—" तो जाणकार स्वरात उद्गारला, "महाराज, आता मला पुरेपूर पटले. हें कौटुंबिक जीवन माझ्यासाठीं नाही. साधूच्या जीवनाच मला मोठ आकर्षण आहे. परत मी कधी घरी जाणार नाही. तिथे जाऊन तुमच्या बहिणीशी सामना द्यायचा ! छे ! अगदी अशक्य." हा निश्चय जाहीर करून तो पुढे म्हणाला, "महाराज, या नको त्या ठिकाणापासून आपण पळ काढू या कसें."

दुपार उलटून गेली होती. बनियाच्या पोटात कावळे ओरडू लागले होते. त्याने एक मिठाईचें दुकान शोधलें आणि तेथें थोडा फराळ केला.

रात्र पडल्यावर एका धर्मशाळेंत त्यांनी जागा मिळते का पाहिलें. पण धर्मशाळेत खूप गर्दी होती. तिथें त्याना जागा मिळाली नाही. तेव्हा ते तिथून बाहेर पडले. आकाशात चंद्रोदय झाला होता. विस्तीर्ण रेल्वे—यार्ड त्या चंद्रप्रकाशात सुप्रकाशित झालें होतें. रामदास त्या आवारात शिरला. आवारात मोठमोठ्या दगडी फरश्या पडलेल्या होत्या. एका फरशीवर आसन ठोकून व जवळ बसायला सागून रामदास बनियाला म्हणाला.

"झोंपायला ही जागा झक्क आहे."

बनिया नुसतेंच 'हूं' म्हणाला. रामदासाचें मत मान्य नसल्याचें त्याला सुचवायचें होते. त्या फरशीखालील पोकळ जागा सशंकित नजरेनें तो पहात राहिला. पण रामदासानें फरशीवर हातपाय पसरलेले पाहिल्यावर तोहि आडवा झाला. माथ्यावरचा चंद्र आणि त्या सभोंवारचें विस्तीर्ण निळेभोर आकाश पहात असताना मोहून जाऊन रामदासाची तंद्री लागली होती.

एकाएकी त्या बनियानें लोकविलक्षण किंकाळी फोडली. रामदास उठून बसून त्याच्याकडे पाहू लागला. 'साप, साप !' म्हणून बनिया किंचाळत होता. एवढ्यात

तो उठून उभा राहिला होता आणि आपल्या अंगावरचे एकच एक धोतर झटकून-टाकीत होता.

तो म्हणाला, "महाराज, ही जागा सापानी भरलेली आहे. आपण इथून दुसरीकडे जाऊ या."

त्या दगडी फरश्याखालीं सरड्यानीं आपली घरें केली आहेत हें रामदासाच्या नजरेस आलें होते. तेव्हा त्या बनियाला धीर देत रामदास म्हणाला,

"रामजी! घाबरायचं काहीं कारण नाही. दगडाखालीं आहेत ते सरडे आहेत. साप नव्हेत. ते अगदीं निरुपद्रवी असतात."

"अहो जे काय असेल ते! पण ते माझ्या पायावरून सरपटत गेले आणि भयाची एक सणक माझ्या सर्वांगातून थरारत गेली."

"हो! पण ते जाऊ दे आता. तू स्वस्थ झोप. घाबरायची मुळीच गरज नाहीं."

रामदासानें अशी समजूत घातल्यावर आणि ती जागा सोडून दुसरीकडे जाण्याची रामदासाची मुळींच इच्छा नाहीं हें स्पष्ट दिसल्यावर तो बनिया अंग दुमडून घेऊन, पाय पोटाशी घेऊन, सर्वांग धोतराने लपेटून घेऊन झोंपला. रात्रीं तो पुन्हा दोनदा किंचाळत उठला. पण हें किंचाळणें त्याच्या पहिल्या भयामुळेंच होतें. वास्तविक त्याच्या पहिल्या भयप्रद किंकाळीने ते बिचारे सरडे इतके भेदरून गेले कीं ते आपल्या वस्तीच्या बिळाबाहेर येणें शक्यच नव्हते. असली भयकारी किंकाळी जो फोडूं शकतो त्याला स्पर्श करण्याचे धाडस त्या सरड्यामध्यें नव्हतें!

[ दुसऱ्या दिवशीं दोघे हनुमानधारा टेकडीवर गेले. रात्री त्यानीं टेकडीवरच्या वरच्या एका उघड्या जीर्ण माडवात मुक्काम ठेवला. आजूबाजूला घनदाट जगल. त्यात हिंस्र श्वापदाची वस्ती. त्यामुळे काळोख पडल्यावर तथे कोणी राहात नसे. पण एकाग्र नामजपाला तें स्थान छान आहे म्हणून रामदासानी रात्र तेथेंच काढायची ठरवली. तिथला साधु संध्याकाळीं टेंकडी उतरून गावात निघून गेला. त्या रात्रीं- ]

रामदास नामस्मरणात मग्न होऊन बसला होता. तो बनिया शेजारीच झोपला होता. भीतीनें गारगार वाऱ्यानें आणि अंगाला झोंबणाऱ्या थंडीने तो कुडकुडत होता. रात्रीं मध्येंच तो किंचाळत उठला.

"महाराज!" तो भयानें कुजबुजला, "कसला आवाज आला हो आत्ता?"

"काही नाही—" रामदास उत्तरला, "रामजी अरे ते डोंगरी उंदीर पळत असतील इकडून तिकडे."

"कशावरून? एखाद वेळ एखादा हिंस्र पशूहि असेल. किंवा कोब्रा असेल. या टेंकडीवर मोठमोठे भयानक साप आहेत असं ऐकलय मी."

"उगाच घाबरू नकोस, रामजी—" रामदास म्हणाला, "अरे, ते उंदीरसुद्धा असतील."

आणखी तासाभराने पूर्वीहून अधिक जवळ आणि मोठा आवाज झाला. बनिया ताडकन उठला आणि किंकाळी मारून, एखादें माकडाचें पिल्लू आपल्या आईला बिलगावें, तसा रामदासाला मिठी मारून बिलगला. ओरडून तो म्हणाला,

"महाराज ! आता काय करायच हो ?"

"रामनाम घेत बस–" रामदासानें त्याला सुचवलें, "जोवर सामर्थ्यदायी रामनाम तुझ्या जिभेवर आहे, तोंवर तुला कशाचीहि भीति नाहीं. चल घे रामनाम आणि स्वस्थ बस बघू."

त्यानतर त्याच्या जिभेवर रामनाम द्रुतगतीनें नाचू लागलें. पहाट फुटेपर्यंत तो जप करीत राहिला. तांबडें फुटलेलें पाहाताच त्याचें भय पळालें. रामनाम थांबलें. थकून भागून तो जमिनीवर पसरला आणि क्षणार्धात घोरू लागला.

रामदास तिथून उठला आणि जंगलात शिरून इतस्ततः भटकत त्यानें कांहीं काळ घालवला. काही ठिकाणी हिंस्र श्वापदाचें अस्तित्व दर्शविणारी जनावरांची शुष्क झाडें त्याला आढळलीं...

बनियाची आठवण होऊन रामदास घाईघाईनें परतला आणि माडवाकडे येऊन त्याला शोधू लागला. तिथला साधु गावातून परत आला होता. तो रामदासास म्हणाला,

"तुम्ही कोणाला शोधताहात ?"

"त्या बनियाला."

"तो बनिया ? तो तर केव्हांच पळाला इथून. मी इकडे येत होतो तेव्हां, पाठीमागें एखादं भूत लागल्यासारखा तो टेंकडी उतरून पळत गेलेला मला दिसला."

हंसून तो पुढें म्हणाला,

"अखेर तो एक धडा शिकला म्हणायचा. साधुत्व मिळवणं ही कांही थट्टा नव्हे !"

---

## लेखकांस विनंती

'श्री साईलीला' मासिकाचें ध्येय व धोरण सर्वांना माहित झालेलें आहे. श्रीसाईबाबांची शिकवण, साधुसंतांची शिकवण, साधुसंतांची चरित्रें, आठवणी त्याच-प्रमाणें साधकाचें व मुमुक्षूजनाचें अध्यात्म मार्गांत मार्गदर्शन होईल अशा प्रकारचे विचारप्रवर्तक व मार्गदर्शक लेख व कविता श्री साईलीलेतून प्रसिद्ध व्हावें व अशारीतीनें श्रीसाईबाबांची सेवा घडावी, यासाठीं आमचे प्रयत्न चालू आहेत. या कार्यांत आमच्या लेखक–वाचकांनी यथाशक्ति सहभागी व्हावें अशी विनंती आहे.

लेख मार्जिन सोडून कागदाच्या एका बाजूस सुवाच्य अक्षरात लिहिलेला असावा.

श्रीसाईलीलेच्या ध्येयधोरणांशीं अनुकूल अशाच लेखांना योग्य वेळीं प्रसिद्धी दिली जाईल.

—संपादक–श्रीसाईलीला




## बाबांचा पुत्रासाठी आशीर्वाद

**श्री.** दामोदर सावळाराम रासने हे १८९५ साली बाबाकडे आले आणि त्यांच्या सेवेंत राहिलें. त्यांना दोन स्त्रिया असूनहि संतान नव्हते. त्यांच्या दुःखात विशेष भर म्हणजे जन्मपत्रिकेमध्यें लग्नस्थानापासुन पचमस्थानी केतू पडल्यामुळें संतानसुख त्यांच्या नशीबीं कधीच शक्य नसल्याचें ज्योतिष्यानीं भविष्य वर्तविलें होतें. पण बाबांवर त्यांची पूर्ण श्रद्धा होती. बाबांनीं पण त्याच्यावर विलक्षण तऱ्हेनें कृपा केली.

एक दिवस बाबानीं मशीदीत जमलेल्या मुलांना आणि माणनाना टोपलीभर आंबे वाटले आणि त्यातून आठच आबे हे दाम्याकरितां [श्री. रासने याच्याकरिता] म्हणून वेगळे काढून ठेवलें. श्री. रासने त्यावेळी तेथे हजर नव्हते. थोड्या वेळानें ते आले पण त्या पूर्वी काही मुलानीं त्यातून चार आबे लाबविले होते. बाबानी राहिलेले चार त्याना दिले व हे स्वतः न खाता आपल्या द्वितीय कुटुंबास देण्याविषयीं बजावले आणि असेंही सांगितलें की हे खाल्यावर त्याना यथावकाश आठ मुलें होतील: त्यापैकी पहिल्याचें नाव दौलतशहा दुसऱ्याचें नाव नानाशहा ठेवावें असेंही त्यानीं सुचविले. बीज रुजण्यापूर्वीच झाडावरच्या फुलाची मोजदाद! केवढें आश्चर्य हें! पण बाबाचा शब्दानू–शब्द खरा ठरला. बाईनीं ती फळे खाल्ली आणि एका वर्षाचे आतच त्याना पुत्ररत्न झालें. दुसऱ्या वर्षी दुसरें याप्रमाणें तिला एकदर आठ मुलें झाली. त्यापैकी चार काळानें ओढून नेलीं आणि अखेर दाम्याला चारच मुलें राहिलीं निपुत्रिक राजा दशरथानें ऋष्यश्रृग, वसिष्ठआदि महर्षीच्या साह्याने पुत्रकामेष्टि यज्ञ केला. त्या यज्ञाग्नीतून दिव्य देवता येऊन तिनें राजाला थोडा हविर्भाव दिला आणि तीनहि राण्यानीं खाताच त्याना चार पुत्र झाले. रामयणांतील ही कथा! ज्या कुणाचा या कथेवर विश्वास नसेल त्यानीं बाबाचें हें अचाट सामर्थ्य पाहिल्यास रामायणावर त्याची श्रद्धा सहजच बसेल. या कथेवरून पुष्कळच लोकाची ही समजूत दृढ झाली कीं बाबा वैदिक ऋषी–महर्षीपेक्षा कोणात्याही दृष्टीनें कमी नाहींत; सद्यःपरिस्थिती अनुरूप लोकहिता साठींच बाबाची शिर्डीस योजना दैवीसूत्रानें झाली आहे.

श्री. रासने याच्याप्रमाणें पुष्कळ पुत्रकामनिकास बाबानी आशीर्वाद दिले आणि ते फळलेही. यापैकी दोघांचाच आपण उल्लेख करूं.

श्री. औरंगाबादकर यांची पत्नी २७ वर्षे पतिसान्निध्यात राहूनसुद्धा तिला एकही संतान नव्हतें. डॉक्टर आणि इतर माणसां कडून हे निश्चित झालें होतें कीं त्यांना आतां मूल होणें शक्य नाही. पण श्री. सौ. औरंगाबादकर यांची बाबांवर आत्यंतिक श्रद्धा असल्यानें त्या शिर्डीस आल्या. श्रीश्याम ( माधवराव देशपांडे ) यांच्या आग्रहावरून बाबांनी त्यांना आशिर्वाद दिला आणि सांगितलें की बारा महिन्यांचे आत तुला मुलगा होईल आणि खरोखरच त्या मुदतींत त्यांना मुलगा झाला.

अक्कलकोटचे श्री. सापटणेकर वकील यांनी आपल्या विद्यार्थीदशेंत बाबांच्या नावाची हेटाळणी केली होती. १० वर्षांनीं ते वकिलीचा धंदा करीत असतांना त्यांचा एकुलता एक मुलगा दगावला. त्यांना मोठा धक्का बसला. बाबांच्या अपमानाची आठवण होऊन त्यांना पश्चात्ताप झाला आणि ते शिर्डीस गेले. पहिल्या भेटींत त्यांचें स्वागत फार तिऱ्हाइतपणानें झाले. पण एक वर्षानंतर त्यांचे पत्नीस स्वप्नांत बाबा दिसले आणि शिर्डीस सहकुटुंब येण्याचें आमंत्रण दिलें. यावेळी भेट होतांच त्यांच्या वकिली जीवनातल्या ठळकठळक प्रसंगाचें बाबांनी स्वतःच त्यांच्यासमोर वर्णन केलें आणि सांगितले कीं "विश्वास ठेव" त्यांच्यावर कृपा करून सांत्वना दिली कीं तो गेलेला मुलगाच पुनः त्यांच्या आईच्या पोटीं येईल, आणि एक वर्षाचे आतच वकील साहेबांना इष्टफल मिळालें.

## बाबांची मुलांवर कृपा

बाबांनीं आपल्या कृपेचें भांडार भक्तांकरिता अशारीतीनें उघडें केल्यावर भक्तांनी तरी त्यापासून फायदा का न घ्यावा ? 'भटाला दिली ओसरी तो हातपाय पसरी' याप्रमाणें त्यांची हाव वाढूच लागली. स्त्रियांना पुत्रप्राप्तीचीं आश्वासनें मिळाल्यावर बाळतपण सुरक्षित होवो किंवा बाळबाळंतीण सुकुशल राहोत इत्यादि प्रार्थना घेऊन लोक बाबांकडे येऊं लागले. आणि बाबाही त्यांना पावले. याचे कित्येक अनुभव आहेत. यासंबधांत श्री. एस. बी. नाचणे यांचा अनुभव फारच रोमांचकारी आहे. शिर्डीस एके दिवशीं एक मूल निजलें असतां बाबा म्हणाले "हे मूल निजलें आहे. आपण उभे राहून याला सांभाळले पाहिजे." तेंच मूल कांही दिवसांनंतर पुरानें नासधूस केलेल्या एका आळींतून फिरत होते. एका बाजूस एका घराकरिता नवीनच खणलेल्या पायाचा ५ फूट खोलीचा खड्डा होता. पण सर्वत्र पाणीच पाणी असल्यामुळें वरून तो खड्डा ओळखू येणें शक्य नव्हते. तें ३–४ वर्षांचें मूल नेमकें त्यांत पडलें. त्याला पोहतां काय येणार ? आणि जवळपास पाहणारेही कुणीही नव्हते. तें मूल निश्चित मेलेंच असतें, पण कसें तरी ते बचावलें ! तूं कसा आलास असें त्याला विचारितां तो म्हणाला "बाबांनी मला तिथे पायऱ्या दाखविल्या आणि त्या चढून मी वर आलो."

एकदा शिर्डीस शांति किर्वंडीकर या नावाची तीन वर्षांची मुलगी विहिरींत पडली. लोक धावले, पण पाहतात तों मुलीला कोणतीही दुखापत न होतां ती एका

कपारीला धरून उभी होती. तूं कशी वांचलीस असें विचारता ती म्हणाली "मी पडल्यावर बाबानीं मला आपल्या हातानी झेलले" आणि याशिवाय दुसऱ्या कशानें ती वाचूं शकली असती ?

श्री. एच. एस. दीक्षित, B. A., LL B. ( माजी एम. एल. सी ) मुंबईचे एक प्रख्यात सॉलिसीटर, यानी अध्यात्ममार्गाची आवड उत्पन्न झाल्यामुळें संसार सोडला व बाबाच्या सेवेस येवून राहिले. त्याचे अंगी पूर्ण वैराग्य बाणावें या हेतूनें बाबा त्याना एक दिवस म्हणाले "काका आता तुम्ही काळजी कशाला करता. सर्व जबाबदारी तर माझी आहे"...आजच बाबानीं आपल्याकडून हें उत्तर का मागितलें हें न जाणताच श्री. दिक्षित म्हणाले, "ठीक आहे."

थोडेच दिवसानतर श्री. दीक्षित व्हिलेपारल्याला आपल्या घरीं आले. त्यावेळी त्यांना कळलें की बाबानीं आपल्याला प्रश्न विचारला त्याच दिवशीं आपल्या मुलीला एक अपघात झाला होता. खेळण्यानी भरलेली एक मोठी आलमारी ती मुलगी खेळत असतानाच तिच्या आंगावर येऊन पडली...पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, हातातील बांगड्या फुटण्याखेरीज त्या मुलीला कोणतीच इजा झाली नाही. जणू ती आलमारी तिच्या आंगावर अगदीं अधर पडली. त्याच वेळी श्री. दीक्षित यास बाबाच्या त्या दिवशींच्या उद्गाराची साक्ष पटली.

मुंबईची एक महिला आपल्या पुत्रासमवेत बाबाची भक्त होती. एके दिवशी सकाळी बाबानी त्यांना सागितलें की दुपारी दोन वाजता मशिदींत या. बाबानी मुलाला आपल्याजवळ चटईवर बसवलें व परवानगीशिवाय उठू नकोस म्हणून सागितलें. २ च्या सुमारास केस विस्कटलेली आणि भीषणमुद्रा असलेली डाकिनीसारखी एक स्त्री भिंतीवरून उडी मारून आत आली आणि म्हणाली "मला हा मुलगा पाहिजे" बाबा म्हणाले 'नाही.' तरी पण ती मुलाला पकडण्यास धावली. बाबा उठले आणि कैक जोराचा लत्ता प्रहार करून तिला किंचाळ्या फोडीतच बाहेर घालवून दिले. बाबानी मग सागितलें कीं ती स्त्री म्हणजे पटकी ( cholera ) या रोगाची देवता. तिला मी घालविलें. आता या मुलाला धोका नाही. त्या मुलाला मात्र ती स्त्री आणि तिथें काय झालें तें दिसले तेवढेंच. पण शुद्धीच लोपल्यामुळे त्याला नतर ऐकू मात्र काहीच आलें नाही,

### श्रद्धा दुणावली

दुसरे एक भक्त, श्री. जी. जी. शिरियन याचा सन १९२४ सालीं आपल्या एका स्नेह्याशीं करार झाला होता कीं त्याच्या मुलाने आपली मुलगी करावी. परंतु काहीं काळानंतर त्या स्नेह्यास हुंड्याबद्दल लोभ सुटून ते आपलें वचन पूर्ण करीनात. श्री. शिरियन यांना फार दुःख झालें पण बाबाशिवाय त्याचा दुसरा साह्यकर्ता कोण होता ? बाबांची प्रार्थना करून त्यानी आश्वासन मिळविलें कीं दोन वर्षांच्या मुलीचें लग्न घडून

येईल, आणि झालेहि तसेंच. त्या स्नेह्याची अधिक हुद्द्याची हाव दुसरीकडे पूर्ण होऊं न शकल्यानें त्याना आपल्या पूर्व करारावरच परत यावें लागलें. श्री. गिरियन याना बाबांच्या वचनपूर्तिसंबंधी शंका मुळीच नव्हती पण या प्रसंगाने त्यांची श्रद्धा अधिक उज्वल झाली हें खास.

आणखी एक आणि शेवटचीच गोष्ट नमूद करावीशी वाटते, तिच्यावरून हे लक्षात थईल की प्रिय भक्तावर कृपा करण्याची बाबांची मजल कोठवर होती. बाबा म्हणत, “मी तुमची आई आहे. माझी मुले माझ्यावर रागावली तरी मी त्यांच्यावर रागावणार नाहीं.” श्रीमती चव्हाण या बाबांच्या सद्भक्तांत एक होत्या. त्यांची बाबांवर निष्ठाही आत्यंतिक होती. काही प्रसंगावरून त्यांनीं बाबावर राग धरला आणि जवळ जवळ त्यांच्या शक्तीस आव्हानच दिलें. आपल्या मुलींच्या लग्नाप्रीत्यर्थ पुष्कळ खटपट करूनही त्याना यश आलें नाही १९३२ सालीं एक सद्‌गृहस्थ जवळ जवळ ६ महिनेपर्यंत पसंतीनापसंतीचे उत्तर पाठविण्यास टंगळामंगळ करीत होते. त्या एके रात्री बाबांच्या फोटोजवळ गेल्या आणि म्हणाल्या “बाबा, तुम्ही आपल्या अद्‌भुत शक्तीचे अनुभव लोकांत आणून देता, पण मलाच का देत नाही ! माझी मुलगी अजून अविवाहित आहे. तुमच्यात जर काही शक्ती असेल तर मला उद्याच्या उद्याच कांहीं उत्तर मिळाले पाहिजे.” त्याच रात्रीं स्वप्नात त्याना बाबानी असें सांगितले की सकाळच्याच डाकेनें त्या पूर्वीच्या गृहस्थाकडून होकार येईल आणि झालेंही तसेंच. विवाहसमारंभही लवकर घडून आला.




## साइभक्तांस अमूल्य संधी

साईलीला मासिकाचे सन १९५८ ( त्रैमासिक ) ते एप्रिल १९५९, ६०, ६१ व ६२ ( मासिक ) मार्चपर्यंतचे कांही अंक शिल्लक असून ते विक्रीस काढले आहेत, फुटकळ अंकास ( विशेष अंकासह ) प्रत्येकी ४ आणे. पोस्टेज निराळे. एक अंकासाठी पोस्टेज ८ नये पैसे व चार अंकास २० नये पैसे पाठवावे.

# हें निस्सीम श्रद्धेचें फळ !

लेखक : श्री. श्री. भा. परांडे

**भगवंताच्या भेटीचें भाग्य सर्वांच्याच वाट्याला येत नाही. तशी निस्सीम भक्ति व श्रद्धा असावी लागते. तें भरपूर भांडवल एकनाथ महाराजांपाशी होतें. गुरुकृपेला ते पात्र झालेले व कसोटीला उतरलेले होते. जेथें ते स्थिरावले तेथून इतर शिष्यांनी पळ काढिला !**

आज स्वामी फक्त फक्त एकनाथाना घेऊन संध्याकाळी कोठेंतरी बाहेर जाणार आहेत ही बातमी खुद्द एकनाथानी व त्याचे पूज्य गुरु श्रीजनार्दनस्वामी यांनी गुप्त ठेवण्याचा प्रयत्न केला तरीहि ती आणखी चार पाच इतर शिष्याना समजलीच. कमी अधिक प्रमाणाने ते सर्वच स्वामीचे आवडते शिष्य असले तरी आपणापेक्षा एकनाथावर स्वामीचा अधिक लोभ आहे हें इतर शिष्य जाणून होते. तेव्हा ही बातमी लागताच त्यानी तर्कानेच ओळखले की आज एकनाथाला काही अधिक अनुग्रह करण्यासाठी स्वामी त्याला एकातात नेणार असावेत.

व्यवसायाने जनार्दनस्वामी किल्लाधिपती असूनही परमार्थात त्यानी फारच उच्च स्थान सपादिलें होतें. दत्तात्रेयाची तीव्र उपासना केल्याने उपास्य मूर्ती दर्शनही त्याना सुलभतेनें होत होते. परतु ही उपासना फार थोड्यानाच माहित असल्यानें बहुतेकजण त्याना किल्लेदार याच दृष्टीने पहात. त्यामुळें त्याना शिष्यपरिवार असा फारसा नव्हता—ते त्याचे ध्येयही नव्हते. एकनाथ त्याच्या सेवेला राहिला तोहि केवळ दृष्टातानेच ! परंतु गुरुसेवेंत निपूण असल्यानें त्याच्या सेवेमुळें स्वामींची त्याच्यावर खूपच माया होती.

या मायेच्या पोटी जो लाभ एकनाथाना स्वामी देतील, त्याचा अल्पसा अश तरी आपणाला मिळावा अशा इच्छेनें त चार पाच शिष्य स्वामींकडे आले—

साऱ्या शिष्यानी स्वामींना दंडवत घातले—स्वामीनी आशिर्वाद दिला—सस्मित मुद्रेने त्यानी विचारले, “ आज एवढ्या सकाळी इकडे कुठें -?”

" नाहीं—सहज आलो महाराज—"

" मग कस काय ठीक आहे—"

" होय महाराज—ठीक आहे आपल्या कृपेन ? "

" चौघाना प्रश्न पडला—कसें विचारावे ! महाराजानी सहज विचारले, " कुणाकडे माझ्याकडे आला होतात की एकनाथाकडे—? "

" आपल्याकडे महाराज—"

" कां—? "

एकाने जरा धीर केला—" आज ऐकल की एकनाथाला एकट्याला घेऊन महाराज कुठेंतरी जाणार आहेत सध्याकाळी—"

स्वामीना आश्चर्य वाटलें—कुठून कळले याना—?

" कुणी सागिनलं तुम्हाला—"

" असच—"

" असच म्हणजे कस ?—"

" नाहीं—म्हणजे समजल – सहज —"

" बर—मग ? "

" तेव्हा म्हणून आलो कीं,— "

जनार्दन स्वामीनी आपल्या डोळ्यावरून हात फिरवून म्हटलं, " अरे—तिकडे काय लक्ष देता—? लोकाच्या बोलण्यात काय तथ्य असतं—? काल संध्याकाळी एकानं आम्हाला जेवायच आमत्रण केलंय म्हणून जाणार आहोंत—"

आता स्वामीच्या पुढें काय बोलणार ? तरीहि एकानें नेट धरला—!

" मग आम्हीं येऊ का — ?—"

" ते मी काय सागू - ? बोलाविल्याविना कोणी जात का— ? —"

" आम्हाला चालेल — ! आम्ही येऊ अगातुक म्हणून — ! नाहीतर महाराजानी आमत्रण द्यायला सागाव त्या यजमानाला — "

" अस काय करता खुळ्यासारख — ? —तुम्हाला पचणार नाहीं तें — "

आता सापडले स्वामी — शिष्याना समाधान झालं — !' पण ते पचवणारे महाराज आहेत ! आम्हीहि सेवकरी तशाच एकनाथ—मग आम्हाला असं पंक्ति प्रपंचानं दूर का ठेवता महाराज—?—" ते सारे काकुळतीला आले.

" खरंच सागतो—तुम्हाला पचणार नाहीं तें ? "

" चालेल—महाराज—! पण आम्हांला येऊं द्यावं."

स्वामींना त्यांची दया आली, त्याचा आग्रह मोडवेना—पण ते अजून ह्या त्या उच्च पातळीवर नाहींत याची त्याना जाणीव होती—शेवटीं ते हिरमोड टाळण्यासाठी म्हणाले, " मी नेईन पण यजमानानच घालवल तर ?

" चालेल—! तर मग येऊ परत—शिवाय महाराजानी आग्रह केला तर तो यजमान काय ऐकणार नाही—?—"

मी काय सागू ? या तुम्ही—गोरज अर्धा दोन घटका—! तेव्हा निघू—''

" ठिक महाराज—कृपा आहे—"

चौधानी दडवत केले आणि ते समाधानाने घरी गेले.

स्वामी स्नानासाठी निघाले—स्नानाची सर्व व्यवस्था नेहमीप्रमाणें सिद्ध होती—त्यानीं सहज बाजूच्या देवघरांत पाहिले—पुढची सर्व पूजेची व आन्हिकाची तयारी करून एकनाथ सध्येला बसला होता. पद्मासन घालून त्याने आपले नेत्र मिटले होते आणि आणि तो ध्यानात मग्न होता — उपासनेचें तेज त्याच्या चर्येवर विलसत होतें. अगदी एकाग्र चित्तानें तो गायत्रीद्वारा पूर्णतत्वाचें ध्यान करीत होता — स्वामींना समाधान वाटलें.—

आज पहाटेपासूनच एकनाथाला शुभ शकुन होत होते—उठता उठताच एका गृहस्थीनें त्याला एक श्रीफळ हातात दिले, त्यामुळें त्याला समाधान वाटलें. नतरही प्रातःस्मरणादिकात त्याला पूर्ण ध्यानधारणा होत होती. अचपल मन स्थिर रहात होतें—अत बाह्य शुद्धी भासत होती—पद वाऱ्यामुळे देहाला शाती वाटत होती सध्येच्या ध्यानातही हवी ती अनुभूती मिळत होती. गायत्रीची दैदीप्यमान मूर्ती त्याच्या अतश्चक्षूपुढें स्थिर होती. मन एकाग्रतेने तिची पूजा करीत—ही मानसपूजा अभग चाळली होती-त्यात विक्षेप नव्हता !

दिवसभर त्याने गुरूंच्या आदेशानुसार उपोषण केलें; परतु त्यामुळे त्याला थकवा मुळीच आला नाही—दुपारी धर्मग्रथ पठणाकडे त्याचें अधिक एकाग्रतेने ध्यान लागलें—त्यामुळे संध्याकाळीं त्याला खूपच उल्हसित वाटत होतें.

स्वामीनी गोरजा आर्धी दोन घटका सागितलें असूनही एकनाथाचें गुरुबधू दोन घटका आधीच येऊन उभे राहिले—जनार्दन स्वामी नुकतेच किल्ल्यातलीं व्यवसायाची कामे उरकून परत आले होते—शिष्यानी त्याना वंदन केलें!—स्वामी हसले.

"आलांत—बसा हं!—आलो मी!—" ते म्हणाले.

शिष्यांना अधीरता होती—तरीही ते तसेच बसले—

थोड्याच अवधींत स्वामी निघाले—एकनाथही बाहेर आला.

सारेजण बाहेर निघाले तोच एक दापत्य सामोरें आले. त्यांनी स्वामींना वदन केलें.—

"इकडे कुठे?"—स्वामींनी प्रति नमस्कार करीत विचारले—

"चिरंजिवाच्या विवाहाची सुपारी--अन् आमत्रण देण्यासाठी—" त्यानी स्वामीच्या व एकनाथाच्या हातावर सुपारी व अक्षता ठेवीत म्हटले—एकनाथाला शकुनानें फार समाधान वाटले—ते निमत्रण स्वीकारून सारेजण मार्गस्थ झाले.

किल्ल्याच्या प्रमुख दरवाजातून बाहेर पडताना आडव्या आलेल्या गाईला उजवी घालून त्यानीं किल्ला उतरण्यास सुरुवात केली. स्वामींनी कुठलीशी पुराणातली कथा सागण्यास सुरुवात केली. ती ऐकता ऐकता ते किल्ल्याच्या पायथ्याशी केव्हा आले त्याचें कोणालाच स्मरण झालें नाही. किल्ल्याच्या पायथ्याशीच वाटेच्या बाजूला दाट जंगल होतें—त्यातल्या एका पाऊलवाटेनें स्वामींनी जाण्यास सुरूवात केली –! शिष्याना तिकडे जाण्याचे प्रयोजन कळेना, परतु तेही त्याच्याच पाठोपाठ निघाले.

किल्ल्याच्या बाजूलाच एक टेकडी होती. तिची एक बाजू तुटल्यानें एक पहाड कड्यासारखा निर्माण झाला होता. टेकडीवरले व किल्ल्यावरले पावसातलें साठलेले पाणी धारेने त्या छोट्या कड्यामधून वहात होते. त्या स्वच्छ पाण्याचे कड्याखाली एक मनोहर मोठेसे तळे बनलें होतें. त्या भोवतीच्या छोट्या सुवासिक फुलानी फारच सुदर दृश्य झाले होते—झऱ्यामुळे गारवा होता--त्याच्या आवाजाने शाततेचा भग होत होता. जवळच्या औदुंबराच्या झाडाची अर्धी छाया त्या तळ्यात पडल्याने तळ्याची शोभा अधिक वाढली.

त्या तळ्यापाशीं स्वामी आल्यावर ते क्षणभर विचार करून म्हणाले, "मला वाटतं. आपण अल्प सायसंध्या इथे करून मगच पुढें जावे. आता सूर्य घटकाभरात अर्धमंडळात येईल—" त्यानी कपडे काढले व पाय धुवून आचमन केले. इतर शिष्यानीहि मुग्धपणे सन्ध्यावदनाला सुरुवात केली. सध्यावदन आटोपता आटोपताच त्या पाऊलवाटेनें एका म्लेंछाचे कुटुब चाललेलें दिसलें— एक कोणी मध्यम वयाचा गृहस्थ आपल्या बिबीसह आपले सामान एका गाईवर टाकून तिचें दावें हातात घट्ट धरून चालला होता त्याच्याबरोबर टोपलीत दोन चार कोबड्याहि होत्या—बिबीच्या हातात एक बकऱ्याच्या गळ्यातली दोरी होती - दोघेजण मोठ्या मजेत चालले होते जनार्दन स्वामींनी अखेरचें उदक सोडून म्हटले – ॐ तत् सत् ब्रह्मार्पणमस्तु—"

त्यानी कपडे घालण्यास सुरवात केली—इतर शिष्यही उठलेच होते, पुढे जाण्यासाठीं–स्वामींसाठीच ते थाबले होते--इतक्यात तो म्लेच्छ स्वामीपाशी आला. स्वामींनी स्मित केले—

क्यों जी—जनार्दनजी किल्लेदार का गढ यही है? त्यानें विचारले.

"हा जी. इस रास्तेसे जाएँगे तो आप एक घटकाभरमें वहाँही पहुचेंगे." जनार्दनस्वामींनी उत्तर दिलें.

मियाँ आपल्या बिबिपाशीं गेला आणि किंचित् मोठ्यानें म्हणाला, "देखो यहाँतक तो आ पहुचें, लेकिन अभी मै तो थक गया. यहाँही खाना पकायगे और बादमे आगे जाएँगे, अभी तो क्या बहोत थोडा रास्ता है."

बिबिला ते पसत पडलें असावें. तिनें पाठीवरचें बोचकें त्या औदुबराखालीं आदळले. मियाँनीही पागोटे फेकलें. उगाच उशीर होऊं नये या इराद्यानेच की काय तिनें तीन दगड जमा केले आणि काटक्याही गोळा केल्या. मियाँनिही आणखी काटक्या जमा केल्या, आणि चमकीनें औदुंबराखालीच बिस्तव पेटविला.

जनार्दन स्वामी सस्मित नजरेनें सारें पहात होते. इतर शिष्यही पहात होते—त्या शिष्याना ते पसंत पडलें नाही. पवित्र औदुबराखाली एक म्लेच्छ—! पण ते कांहींच बोलले नाहींत. जनार्दस्वामी जणूं सहज असे तळ्याकांठच्या एका दगडावर बसून स्वाध्यायातले कुठलेसे सूक्त म्हणत होते—शिष्यानाही बसणे भाग होतें नें सूक्त सपेपर्यंत—! ती दत्तस्तुती होती. ती ऐकता ऐकता कोठेतरी पहावयाचे म्हणून ते सारेजण त्या औदुंबराकडे आणि त्या खालच्या तात्पुरत्या उभारलेल्या ससाराकडे पहात होते—

बिबीने विस्तवावर पाण्याचें भाडे (एक छोटा हडा) ठेवलें आणि मियाँना विचारलें, "आप कहते है लेकिन रसोई किसकी बनाएँगे?"

"क्यौं? कुछ नही बचा है थैलेमें?" मियाँनें दाढी कुरवाळीत विचारलें—

"ना जी. कुछ भी नही—"

"अच्छा फिर मुर्गी काट डालो—वही खाएँगें."

बिबीने थैलीतून एक सुरी काढली आणि पाहता पाहता त्या कोंबड्याच्या माना कापल्या—ते पाहून इकडे शिष्याचा थरकाप झाला. त्याना तो कोंबड्याचा केविलवाणा शब्द ऐकवेना. त्यांनी स्वामींकडे पाहिले—ते औदुंबराकडे पाहून शात स्वरानें दत्तस्तुती म्हणत होते—ती स्तुती अर्ध्यावर आली होती—ती सपेपर्यंत स्वामी उठण्याचें मुळीच चिन्ह नव्हतें

त्यानीं पुन्हा त्या संसाराकडे पाहिलें—बिबीनें कोंबड्याचे तुकडे हड्यात टाकले आणि आंत पहात ती म्हणाली,

"मुर्गीया तो काट डाली लेकिन हडी नहीं भरी."

"अच्छा? फिर वह बकरेको भी काटो, क्या करता आगे ले जाके—"

बिबीनें लीलेनें त्या बकऱ्याच्या मानेवर सुरी फिरवली. त्याचा आवाज ऐकून तर या शिष्यांना कसेसेंच झालें—केव्हा एकदा ती दत्तस्तुती संपते आहे असें त्यांना झालें--स्वामींच्या चेहऱ्यावर याचा काहीच परिणाम दिसत नव्हता. जणूं ते आपल्या देव्हाऱ्यातल्या दत्तमूर्तीपुढेंच बसले असावेत—

किळस वाटत असूनही दाबल्यामुळें अधिकच उफाळलेल्या जिज्ञासेनें त्या शिष्यांनीं पुन्हा मियॉकडे पाहिले; त्याचें लक्ष रसोईकडे होते—दोघानी मिळून बकऱ्याचे तुकडे करून हडीत टाकले---तिनें पुन्हा आत पाहिलें.

"क्या अजीब है जी" ती उमेंट स्वरात म्हणाली, "फिर भी हडी तो आधी ही है"

"देखो मुझे तो बहोत भूक लगी है कुछ भी करके मुझे को पेटभर खाना चाइये-"

"लेकिन करेंगे क्या अभी—?"

त्याने चितातून नजरेनें इकडे तिकडे पाहिले, गाईकडे हात दाखवत तो म्हणाला, "फिर तो इसको भी काटना पडेगा—"

क्षणभरानें तो निर्धाराने म्हणाला, "पर्वा नही आगे दुसरा प्राणी खरीदेंगे—काट डालो—"

बिबी शांतपणे गाईकडे गेली. तिचा हंबरडा कानी पडू नये म्हणून या शिष्यांनीं कानात बोटे घातली आणि माना फिरवल्या—

एकनाथाला आश्चर्य वाटले. वास्तविक स्वामी या किल्ल्याचे मालक असून, इतके शूर असून त्यानी जर मनावर घेतलें असतें तर या म्लेंछाला पैगंबराकडे सहज पाठविले असतें—आणि हे शांतपणे दत्तस्तुती म्हणत बघत बसले आहेत. गाय मेल्याचें याना दुःख नाही—? कुठें गेले यांचें धर्मरक्षण—?

त्यानें पुन्हा पाहिले—गाईचे तुकडे केले होते---रक्त सर्वत्र पसरले होते. तिचे डोके विकल अवस्थेत बाजूला फेकलेले होतें—त्याचा घाणेरडा वास पसरला होता—

जनार्दन स्वामी लुब्ध स्वरांनीं म्हणत होते, "उदारा हा सारा बहुजनपसारा जरी असो—"

स्तुती संपत आली म्हणून संतापलेल्या मुद्रेने शिष्यवर्ग उठले—कुठून आज या नादी लागलो असें त्याना वाटले—असा अमंगल प्रकार, अधर्म, स्वामींना चालला तरी कसा—? आम्ही सहा जणानी याचा फडशा पाडला असता हातीं काहीं शस्त्र असते तर—!

त्याच्या कानी शब्द पडले—

" मेरा ख्याल है आपको आज पेटभर खाना मिलेगाही नहीं. इडी अभीभी भरी नही—काम भी होता नही."

त्यानी आश्चर्यानें मियाकडे पाहिले—

" काम तो होनाही चाइये. खाना तो होना चाइये—" मियॉं ओरडला—

त्याच्या बाजूला गाईचे डोके, बकऱ्याच्या तंगड्या, कोंबड्याची पिसें विखुरली होतीं. रक्ताचा सडा पसरला होता—त्यात ती रक्तलांछित सुरीहि पडली होती—बिबी प्रश्नार्थक मुद्रेने मियॉंकडे पहात होती—मियॉं क्रूर बुभुक्षित नजरेने संतापानें उभा राहून इकडे तिकडे पहात होता.

" ये बम्मन खडे है पकडो उनको और काट डालो—" तो ओरडला—

बिबीने सुरी उचलली—

साऱ्या शिष्याची गाळण उडाली-कोंबडी म्हणता कोंबडी मारली, बकरी म्हणता बकरी मारली, एवढी मोठी गाय तीही मारली--म्हटल्याप्रमाणे—आम्हालाही —मारील !

प्राणभयाने त्या प्रत्येकाला कशाचीही शुद्ध ध्यान उरले नाही !—जनार्दनस्वामी मात्र तसेच स्वस्थ होते. जणूं कांहीच होत नव्हते-त्यानीं थांबायला सांगितलें पण त्यांच्याकडे कोणाचेंच लक्ष नव्हते-बिबीने एक दोन पावले टाकताच त्यांनी पाठ फिरविली आणि भीतीने आल्या वाटेनें धूम ठोकली ! जनार्दन स्वामी मात्र निश्चलतेने होते—एकनाथ उठून उभा राहताच त्यानीं त्याचा हात पकडला-त्यानें ओढण्याचा प्रयत्न केला परंतु स्वामीनीं त्याला घट्ट धरून ठेवलें-आणि दामटून खाली बसविलें-आश्चर्याने थक्क होऊन व्याकुळतेने तो पाहूं लागला—

मियॉंनें त्या चौघाना धावताना पाहिलें आणि तो ओरडला, " तुम उनके पीछे भागते थक जाओगी मैं पकडके लाता हूं" त्यानें हातांत बिबीजवळचा सुरा घेतला—तो त्या पळणाऱ्या शिष्यांमागें धावत सुटला—ते शब्द ऐकून ते शिष्य आणखीच जोरानें धावूं लागले आणि त्यांच्यामागें मियॉं धावत सुटला—

आपल्यास सोडून तो त्यांच्यामागें का धावत गेला हें एकनाथला समजेना—त्याने स्वामीकडे पाहिलें, त्यानी गालात हंसत त्याला शांत रहाण्याबद्दल खुणावलें—परंतु त्याचा हात मात्र सोडला नाही.

पाव घटकेनें तो मियॉं परत आला—" भाग गये दूर तक बहोत जल्दी भागते है कहांसे सीखें इतनें जल्दी दौडनको खुदा जाने ! अच्छा जितनी रसोई है उतनीही देदो-भूखे तो भूखे—" आपलें बरोबरीचे शिष्य पळाल्यानें का होईना, जिवंत आहेत हें ऐकून एकनाथांचा जीव भांड्यात पडला. पण अजूनही स्वामींच्या

तेथें बसण्याचें काय प्रयोजन हें त्याला कळेना—त्यानें स्वामीकडे पाहिले. ते शातचित्तानें एकाग्रतेनें मियॉकडे पहात होते. एकनाथानेही पाहिलें—मियॉ आतां औदुंबरला टेकून एका दगडावर बसले होते. बिबीनें एक मोठी थाळी काढली होती आणि त्यात ती हंडीमधली रसोई ओतत होती.

मियॉनें सहज त्या गुरुशिष्यांकडे पाहिलें आणि म्हटलें, 'देखो, वे दो बम्मन कबके भूखे बैठे है, उनको भी बुलाओ, खानेको।"

एकनाथाच्या अंगात शिसारी भरली. या दुष्टाबरोबर जेवायचें? अमगळ—अपवित्र—!! शिवाय मासाहार—गोमांस—

त्यानें तिडकीने पाहिले—पण जगन्नाथस्वामी हसत उठले होते. त्यानीं एकनाथाकडे स्मित करून म्हटले, "चल—बाबा! एवढा बोलावतोय!"

एकनाथाचें पाऊल निघेना—तो थक्क झाला! ऐवढे कर्मठ गुरु—या ठिकाणीं जेवणार?—

स्वामींनीं त्याचा भाव ओळखला आणि मुद्दाम त्याचा हात धरला—! "गुरुचं ऐकावं—चल!" ते म्हणाले.

गुरुआज्ञा ब्रह्म मानणाऱ्या एकनाथाला तरीहि हलवेना, परंतु मुग्ध झाल्यासारखा तो त्याच्याबरोबर निघाला—

माहेरीं आल्याप्रमाणें स्वामीनी म्लेंच्छाशेजारी माडी ठोकली. एकनाथ उभाच होता. त्यालाही त्यानीं शेजारीं बसविलें—

एकनाथानें थाळींत पाहिलें—रक्ताचा रंग स्पष्ट होता—मध्येंच तुकडे तरंगत होते—त्याला किळस आली—परंतु गुरूपुढें त्याच्या शब्दाची अवज्ञा कशी करायची!—त्यानें केविलवाण्या मुद्रेनें स्वामींकडे पाहिलें—त्यानीं आणि मियॉनें केव्हाच जेवण्यास सुरुवात केली होती एकाच ताटांतून!! एकनाथाचें शरीर विचित्र भावनेनें भरलें—त्याला साऱ्या प्रसंगाचा उगम आला -तो मियॉ ती बिबी, थाळी, रक्तमय रसोई, रक्तलाछित सुरी, इतस्ततः पसरलेले रक्ताचे थेंब इतकेंच काय? स्वामीपासूनही दूर पळून जावें इतका त्याला उबग आला!—ते सारें त्याच्या कर्मठ भाविक धार्मिकतेला सहन होईना!—

स्वामीनी जेवायला सुरवात केली होती. त्यानी सहज एकनाथाकडे पाहिलें. त्याचा हात थाळीत जात नव्हता—"कांरे—खा की? उपाशी आहेस ना?"

एकनाथाला कसेसेच वाटू लागले—प्रत्यक्ष गुरुने सागावे? आज दिवसभराचा उपास अशा जेवणानें सोडायचा?—त्याचे सारे शरीर गरम झालें—अंगाला घाम सुटला—डोळे पाणावले.

" अरे वेड्या—जेव ना—कर सुरुवात—गुरूच ऐकावं ना ?" – स्वामींनीं मुद्दाम हसत म्हटलें.

एकनाथानें गुरुकडे अगदीं करुणेनें पाहिले—हसत हसत ते जेवत होते. त्याला काहीतरी वाटूं लागलें. त्याच्या मनातली गुरुभक्ती जागृत झाली—दृष्टांत आठवला आणि लहानपणाच्या स्वप्नांतले शब्द आठवले, " जनार्दनस्वामी तुझा उद्धार करतील नतरची सेवा, गुरुची माया आठवली सारें आयुष्य आठवलें—

" जेवतोस ना एकनाथ ?—"

एकनाथानें अश्रू पुसले आणि डोळे मिटून दत्तात्रयाचें स्मरण केलें—गुरुची आज्ञा ती त्यांचीच आज्ञा मानली—

का कोण जाणे; पण अशावेळीहि त्याच्या मनात दत्तात्रेयाची मूर्ती अगदीं स्थिर उभी राहिली—त्याला आश्चर्य वाटलें! त्याच मूर्तीचे स्मरण करीत त्याने थाळीत हात घातला—

त्याने पुन्हा घट्ट डोळे मिटले. त्याला अजूनही या कृतीनें अधःपाताची भीति होतीच—त्याच्या नेत्रातून असहाय्य अश्रू वाहू लागले. तथापि त्यानें गुरूचें स्मरण केलें, हृदयस्थ दत्तात्रेयाचें ध्यान करून घास तोंडात कोंबला !!—

त्याला वाटलें अगदीं घाणेरडी चव लागेल. त्याच्या मिटलेल्या पापण्यात अश्रू मावेनात. इतक्यात गुरुचे प्रेमळ शब्द त्याच्या कानावर पडले, " एकनाथ—! अरे—तुझ्या बरोबरच्याना अजून हे मिळायला खूप साधना हवी—ते अगदी लहान आहेत या बाबतीत—म्हणून त्याना चालवण्यासाठी ही सारी माया बर! मी म्हटल्याप्रमाणे त्याना यजमानान हाकललं तर मी काय करणार !! पण हा तुझ्या भक्तीचा परमोच्च बिंदू आज साधला—म्हणून हा लाभ तुला झालाय—"

एकनाथानें शब्द ऐकले पण त्याच्या मनावरचा संस्कार पुसला नाही—त्याच्याने नेत्र उघडवेनात—तोंडातल्या घासाला माधुरी आली होती—तरी तो विरघळलाच होना—

जनार्दन स्वामींनी त्याच्या पाठीवर हात ठेवून ममतेनें म्हटलें, " जरा डोळे उघडून वर तर पहा—!"

एकनाथांनी खालच्या मानेनेच डोळे उघडले—त्याबरोबर त्याना आश्चर्याचा धक्का बसला—समोरची थाली, रसोई, सारे काही जाऊन त्याजागी सुंदर केळीचें पान मांडले होतें. त्यात सर्व हिंदु पद्धतीचें वाढप केलें असून त्यातील तुपानें माखलेल्या पुरणाच्या गरम पोळीचा गरम तुकडा जनार्दन स्वामींनीं एकनाथापुढें केला—

त्यानें आजूबाजूला पाहिल. मघाची सर्व अमगल अपवित्रता अदृश्य झाली होती—सुगधी वायू वाहू लागला होता, आजूबाजूला सुदर फुले फुलली होती—झऱ्याचा शातता भग करणारा आवाज मधुरता वाढवीत होता—सायंपक्ष्यांची किलबिल सुरू झाली होती—मधूनच वाऱ्याच्या झुळकेने झऱ्याचे तुषार अगावर येऊन देह रोमाचित करीत होते—

—आणि या मधुर वातावरणात तो मियॉं कुठे गेला होता कुणास ठाऊक! पण औदुबर छायेत दत्तात्रेयाची सगुणमूर्ती व जनार्दनस्वामी एकाच पानात उपहार करीत होती—

एकनाथ मुग्ध झाला—ज्याची त्यानें इतके दिवस नैष्ठिक भक्तीने उपासना केली तीच त्याच्या हृदयातली मूर्ती समोर उभी होती—

दत्तभक्ताच्या हृदयात निरतर राहणाऱ्या पादुका चरणात होत्या—घोट्यापाशी पिताबराचे जरीचे काठ रुळत होते—पिताबराने आच्छादित पाय—अधिकच हृद्य दिसत होते. सर्वांगी चन्दनाची उटी माखली होती—तिचा सुगध हवेत दरवळत होता. सहाही मनगटावर फुलाच्या व रुद्राक्षाच्या माळा होत्या—गळ्यातही श्वेत सुगधी पुष्पाचा हार वक्षाची शोभा वाढवीत होता. जणू शिवाच्या अंशाला प्रिय वाटल्याने एक रुद्राक्षमाळ गळ्यातही रुळत होती. एका हातात हातात भक्ताची सकटे दूर करण्यासाठी धरलेला त्रिशूळ सध्याप्रकाशातही चमकत होता—शुष्क काष्ठाला सजीवनी प्रमाणे बहरविणारा अमृतमय कमडलू जवळच दगडावर स्थित होता. ज्ञानाची अखड स्मृतिदायिनी स्मरणी एका हातात होती—तिने रजोगुणमयी ब्रह्मदेवाचा अश सुशोभित होत होता. ध्रुवासारख्या पाच वर्षांच्या बालकाला ज्ञानदा शख दुसऱ्या हातात धरलेला—राजेन्द्राची मुक्ती ज्यात स्पष्ट होती असे चक्र एका हातानें सुशोभित होते—कमळजेचा नाजुकपणा दर्शविणारी अधोन्मीलित कमलकलिका एका हातांत गुरुच्या मार्दवानें जणू लज्जित झाली होती—

मुखावर अखड हृद्य स्मित होतें. त्यावरल्या मार्दवात दत्तगुरुची भक्तावरली माया आणि त्याचे आश्वासन विलसत होतें. मस्तकावरल्या जटांत भक्तानी वाहिलेलीं सुवासिक फुलें अजूनही हंसत होती,—सर्वांगातून दशदिशा उजळणारें तेज जणूं ओसंडत होते.

जणूं दत्तात्रयगुरु भक्ताच्याच शोधात होते आणि नैष्ठिक भक्त त्याना लाभला होता—

एकनाथानें ती चारुगात्र मूर्ति पाहिली आणि तत्क्षणीं त्याच्या सर्व वृत्ती निमाल्या—ज्यासाठी इतकी वर्षें त्याचा अट्टाहास चालला होता त्याचे साफल्य त्याच्या नेत्रात सामावले होते. स्वानरुपी निगमही त्याला भाग्यवान वाटू लागले. त्याचें हृदय शांत झाले आणि क्षणांत तें भक्तीनें भरून गेले. अष्टभावानीं तो समाधींत मग्न झाल्यासारखा झाला. पापण्या मिटण्याचें विसरला—झऱ्याचा रव ऐकू येईना—त्याच्या तुषारानी त्याचा देह विचलित होईना—त्याचें सर्वस्व समोर होते, त्याकडे तो टकटक मुद्रेने पहात होता—जणूं हृदयस्पंदन थांबलें असावे.

त्याच्या नेत्रातून सुखाश्रू वाहू लागले—सर्वांगावर रोमांच उठले आणि कंठ रुद्ध झाला. त्याला कांहींच उमजेना. अल्पावधीनें त्याला स्फुरण झाले आणि क्षुधार्ता-प्रमाणे त्यानें दत्तगुरुच्या चरणाला घट्ट पकडून त्यावर मस्तक टेकविलें—जणू झरा रुद्रपाट करीत होता आणि आपल्या प्रेमाश्रूंनी एकनाथ प्रभूच्या चरणावर अभिषेक करीत होता. त्याच्या मस्तकावर ईश्वराच्या हस्तस्पर्शाची स्पष्ट जाणीव त्याला झाली. त्याच्या वृत्ती शांत झाल्या, भगभग विरली!! तो त्यातच तल्लीन झाला—त्याला कशाचेहि भान उरले नाही!!—जणू तो आणि दत्तात्रय याखेरीज विश्वात काहीच नव्हतें—

त्याने जीवन जिंकले होते—त्याच्या आयुष्याची इतिकर्तव्यता त्यात होती—त्याच्या ध्येयातील हृत्कमलाचें त्यात साफल्य होतें—!!


## लहान मुलांच्या आंकडीवर

**जुनें आणि प्रसिद्ध औषध**

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# देवकीच्या आठव्याला आठवा

—श्री. निसर्गदत्त महाराज

**भक्तांचे पायाची माती । मी हृदयी वाहें श्रीपती ॥**
**वानरें श्वापदें ज्यां । पूजिली भावार्थे ॥ ए. भागवत.**

भक्ती साराचेंही सार. ती आत्मप्रेमाची सार्थकता, आत्मप्रेमाची शोभा जर कुठे पहावयास मिळत असेल तर या गुरुभक्तीमध्यें, येथें आत्मप्रेमाची पूर्णता आहे. येथें देव, गुरु इत्यादि नावे वेगवेगळी वाटतात पण अंतर्यामीं ऐक्य आहे. वस्तू एकच आहे. जीव म्हणजे प्रकाशक व जगरुपानें वावरणारा तो देव एकच आहे; भक्ती साठीं त्याला प्रगट व्हावेच लागते. सदगुरुच्या आश्वासनानेंच देवत्व प्रगट होते. प्राण, जीव व शरीर या तिघाची एक मिठी पडलेली असते, ही मिठी त्याच्या परम-भक्तीच्या प्रकाशाने ओळखली गेली पाहिजे. ओळखण्यासाठीं तेथें देवाचा प्रकाश निर्माण आला पाहिजे व तो होण्याकरिता सद्गुरु आश्वासन पाहिजे. सद्गुरूचे आश्वासन असल्याशिवाय अंगचे असलेला तो देव सापडत नाही. ओळखीच्या ओळखीनें अधिक वशिल्याची गरज लागते. कुठेहि वशिल्याशिवाय काम होत नाहीं येथें जीव, शिव व ईश्वर हें एकच अंग आहे. पण प्राणस्वरुपावर विश्वास न झाल्यामुळे विश्वास गमावला. ज्ञानेश्वर तुकारामादिक संतानी तो विश्वास ओळखल्यामुळें ते अनन्यस्वरुप झाले. काया म्हणजे माती व ती टाकावू आहे, परतु जेवढ्यानी भक्ती केली त्याची ती टाकावू काया म्हणजे माती आज इतकी वर्षे होऊनसुद्धा त्या परमात्म्यानें आपल्या हृदयात जशीच्या तशींच ठेविली आहे. अनत भक्त होऊन गेले ते त्या भक्तीशीं अनन्य राहिले. जी केवळ शुद्ध माती, ती शुद्ध होऊन म्हणजे त्या परमात्म्यानें शुद्ध करून प्रत्यक्ष भगवंताची मूर्तिरूपाने घवघवीत ठेविली आहे. भगवान श्रीकृष्ण, श्रीराम, ज्ञानेश्वर, तुकारामादिक सत पुरुषानी ती मातीरूप काया भक्तीसाठी देवाला वाहिली, अर्पण केली. त्या मातीच्या रुपानें परमात्म्याची प्राप्ती त्याना झाली ती इतकी की रिमात्मा म्हणतो "त्याची माती मी माझ्या माथा लावतो." त्या परमात्म्याने ती माती घवघवीत ठेविली आहे. याची महती काय आहे ती पहा ! ही माती त्या परमात्म्यानें आपल्या हृदयांत घवघवीत ठेविली नसती तर साधुसत कसे होतें याचें दर्शन वा देवाचें दर्शत आम्हास झालें

असते का ? माझ्या भक्तीला सिमा नाही, माप नाही, तसे भक्तालाही नाही, ती भक्ती कुठें व कशी प्रगट होईल हे सांगतां येत नाही. परमात्मा म्हणतात की "मी भक्तीचा अंकिला, भक्तीचा पांगिला, भक्तीने मोहिलो." तुमचा प्राण तर भक्तीने भरलेला आहे. तुमच्या शरीरांतील प्राण शुद्ध प्रकाश, भगवान ज्ञानप्रकाश, शुद्ध स्वरुप आहे. प्राण शरीर व जीव पालटून शुद्ध प्रकाश ज्ञानस्वरूप भगवान असा साधा अर्थ घ्या. ज्ञानाविणें 'स्व' चा अनुभव नाही. म्हणून ज्ञान ते स्वरूप व स्व–रूप ते ज्ञान होय.

ज्ञान तेजाने आपणास आतील व बाहेरील सर्व कळा कळतात, स्वरूपाच्या निजतेजे ज्ञान जागृती. निजतेजानेंच जागृती, स्वप्न समाधीमधील सर्व व्यवहार कळतो. स्वप्नामध्ये नाना कळा अवकळा चालतात त्या निजतेजे; जागृतींत स्थिरत्व व सतता हें निजरूप म्हणजे माझे सगुण गुरुरूप अशी साधी आठवण ठेवा. ख्याती, महती, महानकीर्ती, महात्म्य हे या महान प्रकाशावर अवलबून आहे. ज्ञान म्हणून एकापेक्षा एकाची महती, बुद्धीपेक्षा बुद्धीची महती. मूर्खांचा शिरोमणी जरी आहे परतु सद्-गुरूनें सांगितलेली गोष्ट तो जर विसरत नाहीं, म्हणजे त्याने गुरुवचन साधें लक्षात ठेविलें व त्याप्रमाणे वर्ततो तर तो महान पदवीस–शेवटीं परब्रह्म परमात्मा–जातो, जेव्हा तें वचन ऐकलें तेव्हाच तें धरिले, पुन्हा अव्हेरिलें ऐसे नोहे जसा मला खात्रीनें साप चावला मग खात्रीनें, निश्चयानें (ऐकलेलें असते की ते विष अंगात भिनते.) विष चढते, तसे वृत्तीला वळण लावावे. जीवाला तो जसा परम भीतीचा प्रयोग तत्काळ होतो तसा हा परमप्रीतीची जिव्हाळा. (विश्वास) जीवाला होत नाही. परम-विश्वास होण्यापूर्वीच प्रथम बुद्धीचे फवारे, बुडबुडे उद्भवतात.

निर्गुण ही तर परम विश्राती. पण विश्वास होता मूर्ख जीवाच्या बुद्धीतून नाना तऱ्हेचे धैर्य, स्थैर्य व सामर्थ्य उमटतात, त्याचीच मंदिरें, पूजास्थाने दृष्टोत्पत्तीस येतात. ज्याला ही भक्ती मिळाली त्यास नकळत असलेला परमात्मा त्याची सेवा चाकरी बजावतो, बुद्धीचा प्रकाश जेवढा सदुपयोगी–मग तो कोणाच्याहि सदुपयोगी असो–झालेला असेल तेवढें त्यास सुख, शौर्य, त्याचीच सेवा चाकरी होते, त्यालाच योग्यतेच्या या पदव्या भराभर येतात.

आपल्या बुद्धीचा जो साक्षी त्यास, मी मरेन पण कदापि विसरणार नाही, त्यालाच केवळ देव, ईश्वर या प्रतिज्ञेनें असें अचिंत्य चिंतन करतो, तुम्ही असल्याचे जें चिंतन भोगता ते अचिंत्य की सचिंत्य चिंतन ? भगवान चिंतनी चिंतावा

पण त्यास अचिंतनी स्थिर करावा, मग अचिंतनी असलेला तो देव ढळणार नाही. तो डोळियाचाहि डोळा, ध्यानाचाहि डोळा आहे, अचिंतनी तो आहे.

सांप्रत प्राण, जीव व शरीर जे एक झाले आहे तें पालटून ज्ञानस्वरूपानें ज्ञान-स्वरुपावर प्रेम करावे, प्रकाश चैतन्यानें प्रकाश चैतन्यावर प्रेम करावे, प्रेम चैतन्याने प्रेम चैतन्यावर प्रेम करावें. आत्मभावे प्रेम करावे. सद्गुरु चरणी एक क्षणतरी अनन्य व्हा. केवळ मोकळे असे जे अचितनीय चैतन्य ते न आठविता आठवलें आहे तें आठवा, देवकीचा आठवा, त्यास तुम्ही आठवा, सातव्या रामाचाहि आठव आठवा न आठविता त्यास तुम्ही आठवा. न आठविता जो आहे तो योग्य आहे, आठवू जाता आतपणाचे सर्ग पडतात. पुरुष हे विभाग पडले आहेत. न आठविता आठवीजे, हाच तो देवकीचा आठवा, ज्यास भगवान श्रीकृष्ण असे नामाभिधान आले आहे. त्यास त्यास आठवा व तसाच ठेवा, त्यात कल्पना वाढवू नका. कल्पना आठविता तो ना–टव ( न+आठव ) आहे. या अचिंत्य स्वरूप चिंतनी रहा. हा आठवा निसर्ग आहे. त्यात सर्ग, ( विभाग ) नाहीत. न हालविता न चालविता पण विश्वासे त्यास पूजिजे. मारुती वगैरे अनेक देवताच्या मूर्ति पूजिल्या जात आहेत हें आमच्या भक्तीचें रहस्य आहे. ज्यांनी भक्ती केली नाही त्याची माती झाली व ज्यानी गुरुभक्ती केली अशाची माती परमात्म्यानें जशीच्या तशीच आपल्या माथा ठेविली आहे. थोडासा विचार करा व तुमची माती ( शरीर ) त्याच्या चरणावर ठेवा.



तुमच्या देवाचे शिल्पकार तुम्हीच अहात व मालकही तुम्हीच अहात. पुरुषार्थाच्या सहाय्यानें तुम्ही वाटेल ते करू शकता. इकडचें जग तिकडे फिरवूं शकता. नशीब नशीब म्हणजे काय समजता. तुमचे नशीब तुमच्याच हातात आहे.

—स्वामी शिवानंद

# भल्या भाविका !

भल्या भाविका ! दूधखुळा का ? सोड अंध भाव
भजनी लागसि ज्याच्या येथें नाही तो देव
याच नांदतो जगी देव तो, काय कल्पना ही ?
या जगताहुनि योग्य तया का स्थान अन्य नाही ?
परमेशाला अमृत वावडें, तेची आवडते
त्या या जगतामाजी त्या मग कसचे राहवतें ?
न्यायनीति ज्या जगती जाते तुडविरली पायी
तिथे राहणे देवाजीने रुचणारे नाहीं
विचारणाही जेथे नाही सत्यासत्याची
त्या या जगतीं हिंमत देवा नच नांदायाची
धूर्त बोलती सहज, वाटती शब्द खरे जेथे
खरें जयांचें खोटें ठरतें देव कुठुनि तेथे ?
निंद्योगें जिथें प्रतिष्ठा त्या या जगताची
वस्ती देवाजीला कुठली, सांग, रुचायाची ?
मनुजाला विसरतो मनुज वा तत्कृत उपकारा
समज तेथुनि देवें केला कधीच पोबारा
मूर्तिमंत हें रूप मनोहर 'मानव' देवाचें
तुडवुनि पदतलि पूजन जेथें दगडाधातूंचे
ठकबाजी ही जिथें चालते धार्मिकता—नांवें
देवाजीचे तिथुनी ठाणे उठले समजावें
भल्या भाविका ! येथे पुनरपि देव न रे येत
रूढी म्हणुनी अनाचार जों माजे जगतांत !

—कवि वासुदेवसुत कारेकर

# सगुण व निर्गुण उपासना

—संत विनोबा

गंगेचा ओघ सर्वत्र पावन व पवित्र परंतु हरिद्वार, काशी, प्रयाग अशी स्थाने अधिक पवित्र आहेत. त्यानी सर्व ससार पावन केला आहे. भगवद्गीतेची तशीच स्थिति आहे. भगवद्गीता आरभापासून आतापर्यंत सर्वच पवित्र आहे. परतु मध्यतरी काही अध्याय तीर्थक्षेत्रे झालें आहेत. ज्या अध्यायाबद्दल आज बोलावयाचे आहे तो अध्याय मोठा पावन, तीर्थ, झालेला आहे. प्रत्यक्ष भगवानूच या अध्यायाला अमृतधार असें म्हणत आहेत. **"ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते."** हा लहानसा वीस श्लोकाचा अध्याय, परंतु अमृताची धार आहे. अमृताप्रमाणें मधुर आहे, सजीवन आहे. या अध्यायात भगवंताच्या मुखातून भक्तिरसाच्या महिम्याचे तत्त्व गाइलें गेलें आहे.

वास्तविक सहाव्या अध्यायापासून भक्तीच्या तत्त्वाला प्रारम झाला आहे. पाचव्या अध्यायाच्या समाप्तीपर्यंत जीवनाचे शास्त्र पाहिले. स्वधर्माचरणाचें कर्म, त्याला साहाय्यक असें मानसिक साधनारूप विकर्म, या दोहोंच्या साधनेंने सपूर्ण कर्म भस्म करणारी अन्तिम अकर्माची भूमिका, या गोष्टींचा पहिल्या पाच अध्यायापर्यंत विचार झाला. येथें जीवनाचे शास्त्र सपून गेलें. पुढें सहाव्या अध्यायापासून एका अर्थाने भक्तितत्त्वाचाच विचार अकराव्या अध्यायाच्या अखेरपर्यंत झाला. एकाग्रतेपासून सुरवात झाली. सहाव्या अध्यायात चित्ताची एकाग्रता कशी होईल, त्याची साधने कोणती, चित्ताच्या एकाग्रतेची आवश्यकता कशी आहे, हें सागितले आहे. अकराव्या अध्यायात समग्रता सागितली. एकाग्रतेपासून समग्रतेपर्यंत एवढी मोठी मजल आपण कसकशी गाठली तें पाहिलें पाहिजे.

## चित्ताची एकाग्रता

चित्ताच्या एकाग्रतेपासून सुरवात झाली. ही एकाग्रता झाल्यावर कोणत्याहि विषयाचा विचार मनुष्य करूं शकेल. चित्ताच्या एकाग्रतेचा उपयोग—माझ्या आवडीचा विषय घेतला तर—गणिताच्या अभ्यासास होऊ शकेल. अवश्य फललाभ होईल. परतु चित्ताच्या एकाग्रतेचें हें सर्वोत्तम साध्य नव्हे. गणिताच्या अभ्यासाने एकाग्रतेची पूर्ण कसोटी होत नाही. गणितात किंवा अशाच एखाद्या ज्ञान-प्रातात चित्ताच्या एकाग्रतेनें यश मिळेल. परतु ही खरी परीक्षा नव्हे. म्हणून

सातव्या अध्यायात ही नजर देवाच्या चरणाकडे पाहिजे असे सांगितलें. आठव्या अध्यायात ईश्वरचरणी एकाग्रता सारखी रहावी, वाणी, कान, डोळे, सतत त्याच्या ठिकाणी रहावें, म्हणून आमरण प्रयत्न करावे असे सांगितले. आपल्या सर्व इंद्रियांना हा अभ्यास झाला पाहिजे. " **पडिले वळण इंद्रियां सकळां । भाव तो निराळा नाहीं दुजा ॥** " असे झाले पाहिजे. सर्व इंद्रियाना भगवंताचे वेड लागलें पाहिजे जवळ कोणी विलाप करीत असो वा भजन करीत असो, कोणी वासनाची जाळी विणीत असो किंवा विरक्त अशा सज्जनाचा, संताचा, समागम असो, सूर्य असो वा अंधार असो, मरणकाळीं परमेश्वर चित्तासमोर उभा राहील अशा तऱ्हेनें जन्मभर सर्व इंद्रियास वळण लावून घेणें ही सातत्याची शिकवण आठव्या अध्यायांत दिलेली आहे. सहाव्या अध्यायांत एकाग्रता, सातव्यात ईश्वराभिमुख एकाग्रता, म्हणजेच 'प्रपत्ति', आठव्यात सातत्ययोग, नवव्यांत समर्पणता, शिकविली आहे. दहाव्या अध्यायात क्रमिकता सांगितली आहे. पायरी पायरीने ईश्वराचे रूप कसे पचनी पाडावे, मुंगीपासून तो ब्रह्मदेवापर्यंत भरून राहिलेला परमात्मा हळूहळू कसा जिरवावा हें सांगितले. अकराव्या अध्यायात समग्रता सांगितली. विश्वरूपदर्शनालाच मी समग्रतायोग म्हणतो. विश्वरूप–दर्शन म्हणजे एखाद्या लहानशा धुळीच्या कणातहि सबंध विश्व भरलेलें आहे याचा अनुभव घेणें. हेंच विराट् दर्शन होय. अशी ही सहाव्या अध्यायापासून अकराव्या अध्यायापर्यंत भक्तिरसाची निरनिराळ्या रीतीनें केलेली छाननी आहे.

## सगुण की निर्गुण ?

बाराव्या अध्यायात भक्तितत्त्वाची समाप्ति करावयाची आहे. समाप्तीचा प्रश्न अर्जुनानें विचारला. पाचव्या अध्यायातील जीवनाच्या सर्व शास्त्राचा विचार संपताना अर्जुनाने जसा प्रश्न विचारला होता तसाच प्रश्न त्यानें येथेहि विचारला आहे. अर्जुन प्रश्न विचारतो कीं, 'काही सगुणाचे भजन करतात तसें काहीं निर्गुणाची उपासना करतात. तेव्हां ह्या दोहोतून कोणता भक्त देवा तुला प्रिय आहे ?'

भगवान् काय उत्तर देणार ? जशी एखादी आई असावी व तिला तिच्या दोन मुलाच्या बाबतीत प्रश्न विचारावा तसेंच हें आहे. आईचा एक लहान मुलगा असावा. त्याला आईचा फार लळा असावा. आईला पाहतांच त्याला आनंद व्हावा व ती जरा डोळ्याआड होताच त्याने कावरेबावरे व्हावें. आईपासून तो दूर जाऊच शकत नाही. तिला सोडू शकत नाहीं. तिचा वियोग त्याला सहन होत नाही. आई

नसेल तर सर्व संसार त्याला शून्यवत् आहे. असा हा लहान बच्चा आहे. दुसरा मोठा मुलगा आहे. तोहि परम प्रेमानें भरलेला आहे, पण समजस झाला आहे. आईपासून तो दूर राहूं शकतो. तिचें दर्शन वर्ष सहा महिन्यात नाहीं झाले तरी त्याला चालते. तो आईची सेवा करणारा आहे. सर्व ओझे शिरावर घेऊन काम करीत आहे. उद्योगांत गुंतल्यामुळें आईचा वियोग तो सहन करूं शकतो. लोकांमध्यें तो मान्य झालेला आहे व त्याचें नाव सर्वत्र झालेले ऐकून आईला सौख्य होत आहे असा हा दुसरा मुलगा आहे. अशा ह्या दोन मुलाच्या आईला तुम्ही प्रश्न विचारा. ती काय उत्तर देईल? तिला तुम्ही म्हणा, "हे माते, ह्या दोन मुलातील एकच मुलगा तुला देणार आहोत, पसंत कर." माता काय उत्तर देईल? कोणता मुलगा ती पत्करील? तराजूंत दोन्ही मुलें घालून ती का तुलना करीत बसेल? आईची भूमिका तुम्ही लक्षांत घ्या. ती स्वाभाविक काय उत्तर देणार? "वियोगच घडावयाचा असेल तर मोठ्या मुलाचा मी सहन करीन" असें ती बिचारी आई म्हणेल. लहानाला तिनें छातीशीं धरलें आहे. त्याला ती दूर करूं शकणार नाहीं लहानाचा विशेष ओढा ती लक्षांत घेईल व मोठा दूर गेला तरी चालेल असें काहीतरी ती उत्तर देईल. परतु तिला अधिक प्रिय कोण, ह्या प्रश्नाचें तें उत्तर समजता येणार नाहीं काहीतरी भाषा बोलावयाची म्हणून ती चार शब्द बोलेल. परतु त्या शब्दातून फोडून फोडून अर्थ काढला तर तें योग्य होणार नाहीं.

## देवाची धांदल उडाली

त्या मातेची जशी त्या प्रश्नाला उत्तर देताना धादल उडेल, हुबेहूब तशीच धादल भगवंताच्या मनाची झालेली आहे. अर्जुन म्हणतो, "देवा, एक तुझ्याविषयी अत्यत प्रेम बाळगणारा, तुझे सतत स्मरण करणारा, असा आहे. त्याच्या डोळ्याना तुझी भूक, कानानी तुला पिण्याची तृष्णा, हातापायाना तुझी सेवा, तुझी पूजा, असा हा तुझा भक्त आहे. दुसरा स्वावलंबी, सतत इद्रियनिग्रह करणारा, सर्वभूतहितात मग्न, रात्रदिवस समाजाची निष्काम सेवा करताना तुझे परमेश्वराचें जणू स्मरणहि त्याला होत नाही, असा हा अद्वैतमय झालेला तुझा दुसरा भक्त. या दोहोत तुला कोण प्रिय हे मला साग." अर्जुनाचा भगवतास हा प्रश्न. त्या आईनें जसें उत्तर दिलें, हुबेहूब तसेंच उत्तर भगवतानी दिलें आहे. तो सगुण भक्त मला प्रिय आहे. तो दुसराहि माझाच आहे. देवांची धादल उडाली आहे. उत्तर द्यावयाचें म्हणून दिलें आहे

आणि खरोखर वस्तुस्थिति अशीच आहे. अक्षरशः दोघेहि भक्त एकरूप आहेत. दोघाची योग्यता सारखीच. त्याची तुलना करणें म्हणजे मर्यादेचें अतिक्रमण करणें होय. पाचव्या अध्यायांत कर्माच्या बाबतीत अर्जुनाचा जो प्रश्न

तोच येथे भक्तीच्या बाबतीत विचारलेला आहे. पांचव्या अध्यायात कर्म व विकर्म यांच्या साहाय्यानें अकर्माच्या भूमिकेवर मनुष्य येतो. ही अकर्मदशा दोन रूपानीं प्रकट होते. एक रात्रदिवस काम करीत असूनहि लेशमात्र कर्म करीत नाही असा, व दुसरा चोवीस तासात एकहि कर्म न करता सर्व विश्वाची उलाढाल करणारा, अशा रूपानी अकर्मदशा प्रकट होते. याची तुलना कशी करावयाची ? वर्तुळाच्या एका बाजूशी दुसऱ्या बाजूची तुलना करा. एकाच वर्तुळाच्या दोन बाजू. यांची तुलना कशी करावयाची ? दोन्ही बाजू समान योग्यतेच्या आहेत. एकरूप आहेत. अकर्मभूमिकेच्या विवेचनात भगवतांनी एकाला सन्यास व दुसऱ्याला योग असें म्हटलें आहे. शब्द दोन असले तरी अर्थ एकच. संन्यास व योग यांत शेंवटीं सोपेपणाच्या मुद्द्यावरच प्रश्न सोडवला आहे. सगुण–निर्गुणाचा प्रश्नहि तसाच आहे. एक सगुण–भक्त इंद्रियाच्या द्वारा परमेश्वराची सेवा करतो. दुसरा निर्गुण–भक्त मनानें विश्वाचें हित चिंतितो. पहिला जो आहे तो बाह्य सेवेंत मग्न दिसत आहे, पण आंतून त्याचें सारखें चिंतन चाललेलेंच आहे. दुसरा जो आहे तो प्रत्यक्ष काही सेवा करताना दिसत नाहीं, परंतु आतून महासेवा त्याची चाललीच आहे. अशा प्रकारच्या दोन भक्तात श्रेष्ठ कोण ? रात्रदिवस कर्म करूनहि लेशमात्र कर्म न करणारा तो सगुण भक्त आहे. निर्गुण उपासक आतून सर्वांच्या हिताचें चिंतन, काळजी करीत आहे. हे दोघे भक्त आतून एकरूपच आहेत. कदाचित् बाहेरून निराळे दिसत असतील. ते दोघे सारखे आहेत. परमेश्वराचे लाडके आहेत. पण सगुण भक्ति जास्त सुलभ आहे. जें उत्तर पाचव्या अध्यायात दिले तेंच येथेहि दिलें.

## इंद्रिये साधनरूप की विघ्नरूप

सगुण–भक्तियोगात प्रत्यक्ष इंद्रियाना राबवतां येतें. इंद्रियें साधनें आहेत, विघ्नें आहेत, किंवा उभयरूप आहेत. ती मारणारीं आहेत वा तारणारीं आहेत, हे पाहणाऱ्याच्या दृष्टीवर अवलंबून आहे. समजा, एखाद्याची आई मरणशय्येवर पडली आहे व त्याला आइला भेटावयाचे आहे. मध्यंतरीच्या पधरा मैलाचा रस्ता आहे. ही वाट मोटार चालेल अशी नाही आपली मोडकीतोडकी पाउलवाट आहे. अशा वेळी ही वाट साधन आहे का विघ्न आहे ? कोणी म्हणेल, " कशाला हा अभद्र रस्ता मध्यंतरी आला ? हे अंतर नसते तर आईला ताबडतोब भेटलो असतो." अशा माणसाला तो रस्ता दुष्मन आहे. रस्ता तुडवीत तुडवीत तो जातो. त्याला रस्त्याचा राग आला आहे. काही झालें तरी आईला भेटण्यासाठीं झरझर पावलें टाकीत त्याला गेलेंच पाहिजे. रस्ता दुष्मन म्हणून तो जर तेथेच खाली बसेल तर दुष्मन वाटणारा रस्ता त्याला जिंकून घेईल. तो झरझर चालेल तरच त्या दुष्मनाला तो

शिणील. दुसरा मनुष्य म्हणेल, "हें जंगल आहे; परंतु एवढी तरी चालत जाण्यास वाट आहे. हा रस्ता आहे म्हणून बरें. हा मला आईकडे घेऊन जाईल. हा रस्ता नसता तर या पहाडांतून मी कसा गेलों असतों ?" असें म्हणून तो पाउलवाट साधन मानून तो झरझर पावलें टाकीत जात आहे. रस्त्याबद्दल तो मनांत प्रेम बाळगील, त्याला मित्र मानील. रस्त्याला दुष्मन माना किंवा दोस्त माना, अंतर पाडणारा म्हणा किंवा अंतर तोडणारा म्हणा, पावलें झरझर टाकण्याचें काम केलेंच पाहिजे. रस्ता विघ्नरूप किंवा साधनरूप हें मनुष्याच्या चित्ताची जी भूमिका, जी दृष्टि, तिजवर अवलंबून आहे. इंद्रियांचें असेंच आहे. तीं विघ्नरूप कीं साधनरूप हें तुमच्या दृष्टीवर आहे.

सगुण उपासकाला इंद्रियें हीं साधनरूप आहेत. इंद्रियें हीं फुलें आहेत. तीं फुलें परमात्म्याला वहावयाचीं आहेत. डोळ्यांनीं हरिरूप पाहावें. कानांनीं हरिकथा ऐकावी, जिभेनें नाम उच्चारावें, पायांनीं तीर्थयात्रा कराव्या, हातांनीं सेवा करावी. अशा तऱ्हेनें तो सर्व इंद्रियें परमेश्वराला वाहतो. तीं इंद्रियें भोगासाठीं रहात नाहींत. फुलें देवाला वहावयाचीं असतात. फुलांच्या माळा स्वतःच्या गळ्यांत घालावयाच्या नसतात. त्याच प्रमाणें इंद्रियांचा उपयोग ईश्वराच्या सेवेंत करावयाचा. ही झाली सगुणोपासकाची दृष्टि. परंतु निर्गुणोपासकाला इंद्रियें विघ्नरूप वाटतात. तो त्यांना संयमांत ठेवतो, कोंडतो. इंद्रियांचा आहार तोडतो. इंद्रियांवर पहारा ठेवतो. सगुणोपासकाला असें करावें लागत नाहीं. तो सर्व इंद्रियें हरिचरणीं अर्पण करतो. दोन्हीहि तऱ्हा इंद्रियनिग्रहाच्या आहेत. इंद्रियदमनाचेच हे दोन प्रकार आहेत. कांहींहि माना; परंतु इंद्रियांना ताब्यांत ठेवा. ध्येय एकच. त्यांना विषयांत भटकूं द्यावयाचें नाहीं. एक तऱ्हा सुलभ तर दुसरी कठिण आहे.

**निर्गुण उपासना कठीण**

निर्गुण उपासक हा सर्वभूतहितरत आहे ही गोष्ट सामान्य नाहीं. सर्व विश्वाचें कल्याण करणें ही गोष्ट बोलायला सोपी दिसली तरी करावयाला फार कठिण आहे. ज्याला समग्र विश्वाच्या कल्याणाची चिन्ता आहे त्याला ह्या चिन्तनाशिवाय दुसरें कांहींहि करतां येणार नाहीं. म्हणून निर्गुण उपासना कठिण आहे. सगुण उपासना नानाप्रकारें आपापल्या शक्तीप्रमाणें करतां येईल. जेथें आपला जन्म झाला, त्या लहानशा खेड्याची सेवा करणें किंवा आईबापांची सेवा करणें, ही सगुण पूजा आहे. ती तुमची सेवा जगाच्या हिताशीं विरोधी नसावी म्हणजे झालें. तुम्ही कितीहि लहान प्रमाणांत सेवा करा, ती जर इतरांच्या हिताच्या आड येत नसेल तर भक्तीच्या दर्जाला खात्रीनें पोहोंचेल. नाहीं तर ती सेवा आसक्ति होईल. आई, बाप, आपले मित्र, आपले दुःखी बंधु, संत, यांनाच परमेश्वर मानून सेवा करावयाची. तेथें तेथें

परमेश्वराची मूर्ति कल्पावयाची, आणि संतोष मानावयाचा. ही सगुणपूजा सुलभ आहे. निर्गुण पूजा कठिण आहे. बाकी दोहोंचा अर्थ एकच. सौलभ्याच्या दृष्टीनें सगुण हे श्रेयस्कर आहे इतकेंच.

सुलभतेचा एक मुद्दा झाला. तसाच दुसराहि मुद्दा आहे. निर्गुणांत भय आहे. निर्गुण हें ज्ञानमय आहे. सगुण हे प्रेममय, भावनामय आहे. सगुणामध्यें ओलावा आहे. येथें भक्त ज्यास्त सुरक्षित आहे. निर्गुणात जरा धोका आहे. एक काळ असा होता की ज्ञानावर माझी फार भिस्त होती. परंतु केवळ ज्ञानानें माझें कार्य होत नाहीं असा मला अनुभव आलेला आहे. ज्ञानानें मनाचे स्थूल मळ जळून खाक होतात. सूक्ष्म मळ धुऊन टाकण्याचें सामर्थ्य त्यात नाही. स्वावलंबन, विचार, विवेक, अभ्यास, वैराग्य, हीं सर्व साधनें जरी घेतलीं तरीहि त्यांनीं मनाचे सूक्ष्म मळ पुसून टाकतां येत नाहींत. भक्तीच्या पाण्याशिवाय हे मळ धुतले जात नाहीत. भक्तीच्या पाण्यात ही शक्ति आहे. याला तुम्ही परावलंबन म्हणा. परतु 'पर' म्हणजे 'दुसरा' असा अर्थ न घेता 'तो श्रेष्ठ परमात्मा' त्याचें अवलंबन, असा त्याचा अर्थ घ्या. परमात्म्याचा आधार घेतल्याशिवाय चित्ताचें मळ नाहींसें होत नाहींत.

**ज्ञानाचें अचाट सामर्थ्य**

कोणी म्हणेल, "ज्ञान ह्या शब्दाचा अर्थें कमी केला आहे. ज्ञानानें जर चित्ताचे मळ धुतले जात नाहींत तर ज्ञान कमदर्जाचें ठरतें." हा आक्षेप मी मान्य करतो. परतु माझे असें म्हणणें आहे की शुद्ध ज्ञान ह्या मातीच्या पुतळ्यात होणें कठिण आहे. या देहांत राहून उत्पन्न झालेले ज्ञान कितीहि शुद्धरूप असलें तरी तें थोडेसें कमसल राहणार या देहात उत्पन्न होणाऱ्या ज्ञानाची शक्ति मर्यादित असते. शुद्ध ज्ञान जर निर्माण झालें तर सर्व खळमळाची तें राखरांगोळी करील यांत मला बिलकूल शंका नाहीं. चित्तासकट सारे मळ जाळून टाकण्याचें सामर्थ्य ज्ञानांत आहे. परंतु ह्या विकारी देहात ज्ञानाचें बळ तोकडें पडतें. म्हणून त्यानें सूक्ष्म मळ धुतले जात नाहींत. भक्तीचा आश्रय केल्याशिवाय सूक्ष्म मळ पुसून टाकता येत नाहींत म्हणून भक्तीमध्ये मनुष्य अधिक सुरक्षित आहे. 'अधिक' हा शब्द माझ्या पदरचा म्हणून समजा. सगुणभक्ती सुलभ आहे. येथे परमेश्वरावलंबन आहे. निर्गुणात स्वावलंबन आहे. ह्यातील 'स्व' चा तरी काय अर्थ आहे? स्वावलबन म्हणजे स्वतःच्या अंतःकरणांतील परमात्म्याचा आधार हाच तेथेंहि अर्थ आहे. केवळ बुद्धीच्या आधारानें शुद्ध झालेला असा कोणी मिळणार नाहीं. स्वावलबनानें, म्हणजे अंतःकरणातील आत्मज्ञानानें, शुद्ध ज्ञान मिळेल. सारांश निर्गुण भक्तीच्या स्वावलंबनांतहि आत्मा हाच आधार आहे.

सगुण उपासनेच्या बाजूनें सुलभता व सुरक्षितता हीं वजने मीं टाकलीं तशीं निर्गुणाच्या बाजूनेंहि मला टाकतां येतील. निर्गुणामध्यें मर्यादा राहते. उदाहरणार्थ,

आपण निरनिराळी कार्ये करण्यासाठी सेवेसाठी संस्था स्थापन करतो. संस्था स्थापन होते ती प्रथम व्यक्तीमुळें होते. ती व्यक्ति मुख्य आधार असते. संस्था प्रथम व्यक्तिनिष्ठ असते. परंतु जसजसा संस्थेचा विकास होत जाईल तसतशी ती संस्था व्यक्तिनिष्ठ न राहता तत्त्वनिष्ठ झाली पाहिजे. जर अशी तत्त्वनिष्ठ उत्पन्न झाली नाही तर ती स्फूर्ति देणारी व्यक्ति लोपताच त्या संस्थेत अंधार पडतो. माझा आवडता दृष्टान्त द्यावयाचा झाला तर चरख्याची माळ तुटताच सूत कातणे तर राहोच, परंतु कातलेलें सूत गुंडाळीन म्हणेन तर तेंहि शक्य होत नाहीं. त्याप्रमाणेच त्या व्यक्तीचा आधार तुटताच संस्थेची दशा होते. ती संस्था पोरकी होते. व्यक्तिनिष्ठेतून तत्त्वनिष्ठा उत्पन्न झाली तर असे होणार नाही. सगुणाला निर्गुणाची मदत पाहिजे. केंव्हा तरी व्यक्तीतून, आकारातून, बाहेर जावयास शिकलें पाहिजे गंगा हिमालयातून, शंकराच्या जटाजूटातून निघाली, परंतु तेथेच राहिली नाही. तो जटाजूट सोडून, ती हिमालयाची दरीखोरी, वनेजंगले सोडून. सपाट मैदानावर खळखळ वाहत आली तेव्हा विश्वजनांच्या उपयोगात ती येऊ शकली. त्याप्रमाणें व्यक्तीचा आधार सुटला तरी तत्त्वाच्या खंबीर आधारावर संस्था उभी राहण्यास तयार असली पाहिजे. कमान बांधीत असताना तिला आधार देतात; परंतु आधार काढून घ्यावयाचा असतो. आधार काढून घेतल्यावर ती कमान टिकली तरच तो आधार खरा होता असे समजावयाचे. प्रथम स्फूर्तीचा झरा सगुणातून निर्माण झाला हें खरें, परंतु शेवटी परिपूर्णता तत्त्वनिष्ठेंत निर्गुणात झाली पाहिजे. भक्तीच्या पोटातून ज्ञान निर्माण झाले पाहिजे. भक्तीच्या वेलीला ज्ञानाचीं फुलें लागलीं पाहिजेत.

## तीन प्रकारच्या निष्ठा

बुद्धदेवानी ही गोष्ट ओळखली होती. म्हणून त्यानीं तीन प्रकारच्या निष्ठा सांगितल्या आहेत. प्रथम व्यक्तिनिष्ठा असली तरी तीतून तत्त्वनिष्ठा एकदम तत्त्वनिष्ठा जरी नाही तरी निदान संघनिष्ठा, उत्पन्न झाली पाहिजे. एका व्यक्तीबद्दल जो आदर होता तो दहा पंधरा व्यक्तीबद्दल वाटू लागावा संघाबद्दल सामुदायिक प्रेम नसेल तर बेबनाव होतील, भांडणें होतील. व्यक्ति–शरणता सुटून संघ–शरणता निर्माण झाली पाहिजे. आणि पुढे सिद्धान्त–शरणता आली पाहिजे. म्हणून बौद्धात "**बुद्धं शरणं गच्छामि। संघं शरणं गच्छामि। धर्मं शरणं गच्छामि।**" अशा तीन प्रकारच्या शरणागति सांगितल्या आहेत. प्रथम व्यक्तीबद्दल प्रीति, नंतर संघाबद्दल प्रीति, परंतु या दोन्ही निष्ठाहि डळमळीतच आहेत. शेवटी सिद्धान्तनिष्ठा उत्पन्न झाली पाहिजे. तरच संस्था लाभदायी होईल. स्फूर्तीचा झरा जरी सगुणातून निर्माण झाला तरी तो निर्गुणाच्या सागरास जाऊन मिळाला पाहिजे. निर्गुणाच्या अभावीं सगुण सदोष होतें. निर्गुणाची मर्यादा सगुणाला समतोल ठेवते याबद्दल सगुण निर्गुणाचे आभारी आहे.

---

# सत्याचें प्रचंड सामर्थ्य

—सत्यान्वेषी

धार्मिक समारंभात श्रीमत आणि गरीब असे भेदभाव पाडावे व गरिबासाठी म्हणून धार्मिक प्रार्थनेचा वेगळा दिवस राखून ठेवावा ही भावना त्याज्य असून ती स्वागतार्ह नाही हे आम्ही स्पष्टपणे सांगू इच्छितो. धार्मिक प्रार्थनेच्या बाबतीत गरीब आणि श्रीमंत हा भेदभाव कशासाठी ? धर्म म्हणजे तुम्ही काय समजता ? धर्माची माकूर श्रीमंतानी खावी आणि त्याचे जे तुकडे शिल्लक रहातील ते गोरगरिबांनी खावे असला हा प्रकार आहे का ? धर्माच्या बाबतींत जातिभेदाला किंवा वर्गभेदाला स्थान नाही. ते भेद मारक होणारे आहेत. खरे सांगायचे म्हणजे धर्मभावनेशीं श्रीमतापेक्षा गोरगरिबाचाच अधीक संबंध आहे. श्रीमतापेक्षा गरिबानाच धर्मभावना अधिक जवळची आहे. गरिबाकडे ती भावना फार लौकर खेचली जात असते. संकटपरंपरा व दारिद्र्य याचे खतपाणी मिळून जी भूमि तयार झालेली असते त्याच भूमीत धर्माचे रोपटे वाढून त्याचा वटवृक्ष बनत असतो. परिस्थितीमुळे श्रीमताचा ओढा सुखोपभोगाकडे असतो व त्याच्या सभोंवार मोहजाळ पसरलेलें असतें. त्यात केव्हा अडकायला होईल हे सांगता येणें कठीण असते. त्याचे अधीक लक्ष असतें आजच्या घडीकडे, उद्याची त्याना चिंता नसते. पुढें काय होईल त्याची काळजी न करता किंवा सत्याची चाड न बाळगता तात्काळ जें समोर येईल त्याचा विचार करावयाचा. खडकावर टाकलेलें बी फुकट जातें त्याचप्रमाणें धर्मभावनेचें बी त्याच्या अतःकरणात मूळ धरूं शकत नाही. कारण तेथें त्याची जोपासना होऊं शकत नाहीं.

खाईस्ट कोण होता ? तो एक गरीब माणूस होता. त्याला श्रोते लाभले होते तेहि गरीबीत वाढलेले व जगाने तुच्छ लेखलेलें ! राजपुत्र सिद्धार्थानें काय केलें ? वेळ आली तेव्हा भरजरी राजवस्त्रे त्यानें फेकून दिली आणि भिकाऱ्याची वस्त्रे धारण केली आणि मग तो बुद्ध किंवा धर्मावतार झाला. कबीर कोण होता ? नानक कोण होता ? आणि आमचा तुकोबाराय ? हे सारे गरिबींत वाढले.

बाळपणात किंवा आरंभ काळात कोणतीहि धार्मिक चळवळ असो, तिच्याकडे तुच्छतेच्या व उपेक्षेच्या दृष्टीने पहाण्यात त्या काळातील मातबराकडून आले आहे. परंतु ज्या चळवळीत खोटेपणा नसतो, ज्या चळवळींत चिरंतन सत्याचे बीज असतें, ज्या प्रकाशात माणूस दिपला जातो, ती चळवळ आस्ते आस्ते का होईना वाढत जाते, ती जगभर पसरते आणि मग ज्या गरिबानीं त्या चळवळीची मुहूर्तमेढ रोविली त्याच्यापुढे धनिक लोक माना वाकवायला लागतात व शक्तिमान् लोकही त्यांच्या पायांवर लोटांगणें घालायला तयार होतात. सत्याचें सामर्थ्य एवढें प्रचंड असते. त्या सत्याची कांस धरल्यामुळे गरीब, टाकाऊ व तुच्छ मानलेल्याच्या वाट्यास जगाचा शिक्षक होण्याचा बहुमान येत असतो व श्रीमंतांना, माननियाना व ताठर लोकांनाही त्यांचे चरण धरावे लागतात, तेव्हां सत्याचें तेज एवढें प्रखर व कोणालाही दिपवून टाकणारें असतें.

# हॉस्पीटल फंडाकरितां मुंबईकडील जमा

## २६।५।६३ तें ३१।७।६३ अखेर

| आ. न. | नाव | पत्ता | रु न.पैसे |
|---|---|---|---|
| १ | शेठ सि. पी. पारेख च. ट्रस्ट | मुंबई | २०००.०० |
| २ | सौ. धुबे एस. एम. | पूणे | ५०१.०० |
| ३ | श्री. जेटली एस. के. | दिल्ली | ५०१.०० |
| ४ | ,, परेल एम सी. | यु. के. | १४४.०० |
| ५ | श्रीमती पार्वती मेनन | केराला | १२०.०० |
| ६ | डॉ. बाटलीवाला होमी ए. | मुंबई | १०८.०० |
| ७ | श्री. डोशी एच. जी. | ,, | १०१.०० |
| ८ | जस्टीस मुधोळकर जे. आर | दिल्ली | १०१.०० |
| ९ | श्री मुणगेकर एम. एस. | मुंबई | १०१.०० |
| १० | ,, पाटील बाबुराव के | डांग्रस | १०१.०० |
| ११ | ,, रामचं टी. | अदिलाबाद | १०१.०० |
| १२ | ,, मकड एम. एस. | अहमदाबाद | ७५.०० |
| १३ | श्री. व श्रीमती पुरुषोत्तम एच.पी | हैद्राबाद | ५०.०० |
| १४ | ,, किणी चंद्रकात | मुंबई | ३०.०० |
| १५ | मे. पे ऑटामाबाईल्स | सिकंदराबाद | २५.०० |
| १६ | श्रीमती सिधवा मेहेरू पी. | मुंबई | २५.०० |
| १७ | श्री. मिस्त्री बी. शिवराम | कुंभकोणम | २७.५० |
| १८ | ,, शहा रसिक | मुंबई | ४५.०० |
| १९ | ,, मोगरेलिआ डी. डी. | ,, | २५.२५ |
| २० | ,, घीरनीकर एल. एन. | दुर्गापूर | १०१.०० |
| २१ | श्रीमती सिधवा पेरीन पी | मुंबई | ५.०० |
| २२ | श्री. कोठारे व्ही. एम. | ,, | ११.०० |
| २३ | ,, भोसले आर. बी. | ,, | ११.०० |
| २४ | ,, राणे व. मो. | ,, | ११.०० |
| २५ | ,, शहा आर. एच. | बडोदा | ११.०० |

| आ न. | नाव | पत्ता | रु.न.पैसे |
|---|---|---|---|
| २६ | श्री. मिस्त्री एम. एच. | मुंबई | १२·०० |
| २७ | मिसेस बाटलीवाला होमाय | ,, | २१·०० |
| २८ | श्री. डागे एम एस. | ,, | ११·०० |
| २९ | ,, नायडू एस. ए. | दिल्ली | ६·०० |
| ३० | श्री. गोसाई एच. के. | अहमदाबाद | ५·०० |
| ३१ | सौ. नायडू आर. एस. | मद्रास | ५·०० |
| ३२ | श्री. बोरकर डी. एन. | मुंबई | ५·०० |
| ३३ | ,, वस्त पी. पी. | ,, | १०·०० |
| ३४ | मिसेस कणेकर नलिनी | ,, | ५·०० |
| ३५ | श्री. कोठारे डल्यु. एच. | ,, | १०·१० |
| ३६ | ,, मेहता के. डी. | ग्वालेर | १०·०० |
| ३७ | ,, भट एम. जी. | मुंबई | १०·०० |
| ३८ | ,, भट जी. आर. | ,, | १०·०० |
| ३९ | ,, परमार जी. एन. | लझाका | ६६·२५ |
| ४० | मे. एन. आर. डी. कंपनी | सॅलसबरी | ३३·१३ |
| ४१ | श्री. पटेल बीजे | केनया | ३३·१३ |
| ४२ | ,, रतनशा आर. | नौरोबी | ३३·१३ |
| ४३ | ,, देव जे. | कुवाईट | २६·५० |
| ४४ | मे. कोपर बॅट टेलर्स | मुफुलिरा | २६·५० |
| ४५ | श्री. दवे बी जे. | दरेसलाम | २६·५० |
| ४६ | ,, पचाळ एच. जे. | युगोंडा | १६·५६ |
| ४७ | ,, पटेल सिबी | न्होडेसिआ | १३·२५ |
| ४८ | ,, सिताराम एम. आर. | शिलॉग | १०·०० |

☆

# श्रीसाईनाथ हॉस्पिटल

## ता. २४।५।६३ ते ता. १५।७।६३

साईभक्तांनी शिर्डी येथील श्रीसाईनाथ हॉस्पिटल फंडासाठी दिलेल्या देणग्यांची यादी साभार पुढे देण्यात येत आहे.

| अ. नं. | नाव | पत्ता | रु.न.पैसे |
|---|---|---|---|
| १ | श्री. नटवरलाल गोविंदजी जव्हेरी | माटुंगा | २५.०० |
| २ | ,, प्राणलाल पो. मगलाणी | चेंदणी | ३१.०० |
| ३ | ,, आर. एल. गोसलीया | मुंबई २२ | १०१.०० |
| ४ | ,, तदाणी ॲडव्होकेट | मुंबई २ | ५.०० |
| ५ | ,, बी. टी, रावणी | मुंबई | ११.०० |
| ६ | सौ. ताराबाई परुळकर | हारदा | १०.०० |
| ७ | श्री. जी पी. पटेल | बुटवाडा मढी सुरत | ५१.२५ |
| ८ | ,, वनमाळी कल्याणजी | .. | ५.२५ |
| ९ | ,, कुमार | पुणा | १०.०० |
| १० | ,, ललीताबेन | वॅटेरसीया स्वीडन | १००.०० |
| ११ | ,, दशरथ दौलत पाटील | मगरुळ | १६.०० |
| १२ | ,, जी. व्ही ओझा | युगांडा पू. आफ्रिका | ५१.०० |
| १३ | ,, महमुद करीम | पू. आफ्रिका | ८.०० |
| १४ | ,, कॅप्टन नातू | अहमदाबाद | ४२.०० |
| १५ | ,, एन. व्ही. आपटे | सातारा | ५.०० |
| १६ | ,, मोतीराम सेवाराम राठी | मुर्तीजापूर | २१.०० |
| १७ | कु. मंगला भ. मनडोरे | जळगाव | ५०.०० |
| १८ | श्री जी. पी. पाटील | मुंबई | ५१.०० |
| १९ | ,, ए. डी. सरदेसाई | संगमेश्वर-रत्नागिरी | ११.०० |
| २० | ,, कोटा ॲन्ड फ्रेंडी | मुंबई | ५१.०० |
| २१ | ,, पी. एम. व्यास | मुंबई | १०१.०० |
| २२ | डॉ. रंजन भट्ट | ,, | ११.०० |
| २३ | श्री. भट्ट | ,, | ५.२५ |
| २४ | डॉ. एस. डी. गुजराथी | शिर्डी | १५.०० |

| अ. न. | नाव | पत्ता | रु.न पैसे |
|---|---|---|---|
| २५ | मिसेस उर्मीला जयती लालपरीख | मुंबई | ११५.०० |
| २६ | एक साईभक्त | ,, | १०१.०० |
| २७ | श्री. एस. एस. करमाड | जमशेदकर | ५१.०० |
| २८ | ,, एम. एस. राव | पुणा | ५५.०० |
| २९ | ,, ए. आर. मुळे | मुंबई | ५.०० |
| ३० | सौ. सिताबाई रामचद्र पाटणकर | पुणे | ५१.०० |
| ३१ | श्री डी. सी. देसाई | मुंबई | २५.०० |
| ३२ | ,, जी. एस. जोशी | ,, | ५.२५ |
| ३३ | ,, दामोदर विनायक भागवत | जालना | ११.०० |
| ३४ | सौ. विजया ल. पडते | वादा, रत्नागिरी | ५.०० |
| ३५ | डॉ. व्ही. एच. पटेल | सरभोन, बारडोली | १००.०० |
| ३६ | श्री. एस. आर. पटेल | वडाळी, बारडोली | १००.०० |
| ३७ | श्री. पी. जे. सोलव | अमरावती | ५०००.०० |
| ३८ | ,, एम. जी. सरदाणा | डेहराडुन | ५१.०० |
| ३९ | ,, मीनाक्षी सरदाणा | लक्ष्मीवाडी | ११.०० |
| ४० | ,, व्ही. पी. नातु | पुणा | ५.०० |
| ४१ | मिसेस एस. सी पटेल | दादर-मुंबई | १०१.०० |
| ४२ | श्री. केशवभाई वथीजा | ,, | ५.०० |
| ४३ | ,, एम् डब्ल्यु. पाटक | सोर्शी-अमरावती | १०१.०० |
| ४४ | ,, मोहमद अमीत | इंदोर | ५.०० |
| ४५ | ,, हरी माधव चौधरी | सामरोद-जामनेर | २१.०० |
| ४६ | ,, मधुकर नळवळकर | मुंबई | १०.०० |
| ४७ | डॉ. सी. रा. आमोदकर | ,, | २६.०० |
| ४८ | श्री. के. जी. रओ. | कोरामशाह-द.इराण | १०१.०० |
| ४९ | श्री. लालचद किसनचंद | मुंबई | ५१.०० |
| ५० | एक साई भक्त | ,, | १०१.०० |
| ५१ | श्री. शारदादेवी पोतदार | मुंबई | ५००.०० |
| ५२ | सौ. सुनदा वलवली | मुंबई १९ | ६०.०० |
| ५३ | श्री. मालती कुलकर्णी | मुंबई १९ | ५.२५ |

| अ. न. | नाव | पत्ता | रु.न.पैसे |
|---|---|---|---|
| ५४ | श्री. कृष्णाबाई कुलकर्णी | मुंबई १९ | ५.२५ |
| ५५ | ,, एस. के. कुलकर्णी | नांदेड | ५१.०० |
| ५६ | मिसेस ए. पी. ठक्कर | मुंबई | ५१.०० |
| ५७ | श्री. एन. के. संघवी | मुंबई | १०१.०० |
| ५८ | ,, व्ही. के. शहा | मुंबई | ५१.०० |
| ५९ | सौ. ललीता बापट | मुंबई | ४५.०० |
| ६० | श्री. डी. के. सत्यरेड्डी | गडवाल | ११.०० |

☆

## म. ऑ. ने आलेल्या रकमेचा तपशील

### ता. २०।५।६२ ते १४।७।६२ अखेर

| अ. न. | नाव | पत्ता | रु.न.पैसे |
|---|---|---|---|
| १ | श्री. भालचंद्र देशमुख | वर्धा | ८१ ०० |
| २ | ,, बहादर पुरकर | C/o 56 A P. O. | ५१.०० |
| ३ | ,, आय. कुप्पास्वामी मिलाय | निझामाबाड | १६.०० |
| ४ | ,, व्ही. राजन अॅन्ड कंपनी | सिकंद्राबाद | १०.०० |
| ५ | ,, एच. हरु हलवे | जावरा | १०.०० |
| ६ | ,, एस. जी छत्रे | रायपुर | १०.०० |
| ७ | ,, आर. बी. पाटील | चिकोडी | ५१.०० |
| ८ | ,, नागनाथ गोपाळराव शहाणे | नांदेड | ६.०० |
| ९ | ,, प्रदीप डी. कालेकर | मुंबई | १०.०० |
| १० | ,, लॉरेंझो वॉच कंपनी | मद्रास | २५.०० |
| ११ | एक साईभक्त | इंदोर | ५.०० |
| १२ | श्रीमती नार्वेकर | मुंबई | ५.०० |
| १३ | डॉ. आर. एस. खांडेकर | मुर्तिजापूर | ५.०० |
| १४ | श्री. एम्. रंगा नायकाल | सिकंदराबाद | ५.०० |
| १५ | डॉ. मिसेस एच.बी.सेट्टी | मड्या | १९.०० |
| १६ | श्री. पी. एम्. नाटेकर | दोडामार्ग | ५.०० |
| १७ | ,, एस. एस. मलीमठ | बंगलोर | १००.०० |

# श्रीसाईनाथ वाचनालय शिर्डी, देणगीदाखल मिळालेलीं पुस्तकें

| अ.न. | पुस्तक देणाऱ्याचे नाव | पत्ता | पुस्तकें नग | पुस्तकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. वाय. बी. सोनार | शिर्डी | १ | नामयाची जनी |
| २ | ,, प्रल्हाद गगाधर शेळके | ,, | २ | सत एकनाथ, सत नामदेव |
| ३ | ,, गो. वि. क्षिरसागर | धुळे | १ | ज्ञानेशाचा सदेश |
| ४ | ,, जे. सी. मोदी | शिर्डी | ३ | विचार सागर, (गुजराथी) जगाची जननी शाकिदाथी विचार |
| ५ | ,, हनुमतराव गो. मोरे | कोल्हापूर | २ | नददीप व काबूलीवाला (नाटके |
| ६ | ,, काशिनाथ डोळस | मुंबई १२ | २ | तो मी नव्हेच व मोरुची मावशी (नाटके) |
| ७ | ,, ईश्वरसिंघ ठाकूर | पुणे २ | १ | शीख लोकाचा सक्षिप्त इतिहास |
| ८ | ,, अविनाश श्रीपाद दर्प | शिर्डी | ६ | कैवल्य पुरुप खड १ ला, कैवल्य वैभव, कैवल्य प्रसाद, पवित्र भारत वर्णन, कैवल्य बोध, नित्योपासना क्रम. |
| ९ | सनातन धर्म प्रचारक | बगलोर | १ | भगवान श्रीसाईबाबा (कानडी) |
| १० | श्री. सुरेश शिरगावकर | शिर्डी | २ | तो मी नव्हेच व एकाद्याचे नशिब (नाटकें) |
| ११ | ,, सुहास मनोहर सावंत | औरंगाबाद | २ | राजाची देणगी, उडती माडी |
| १२ | ,, मरुती शकर शिंदे | शिर्डी | १ | अलीबाबा आणि चाळीस चोर |
| १३ | सौ. विमलबाई एम्. खडकतर | अहमदनगर | १ | गुलबकावली |
| १४ | श्री. ज्ञानदेव यशवत भागवत | शिर्डी | १ | पवना काठचा धोंडी |
| १५ | ,, मुन्ना सहादु नागपूरे | येवला | १ | बिरबल व बादशहा |
| १६ | ,, बापू गायके | शिर्डी | १ | गोलदाज आणि काचन |
| १७ | कु. सुमन गोंदकर | ,, | १ | सिंह जागा झाला |
| १८ | श्री. चिंतामणी अय्यर | ,, | १ | छत्रपती शिवाजी |

# श्रीगुरुपौर्णिमा उत्सव

## शके १८८५

श्रीसच्चिदानंद सद्‌गुरु श्रीसाईबाबा महाराज यांचा श्रीगुरुपौर्णिमा उत्सव साला-बादप्रमाणें मिति आषाढ शु. १४ दिनांक ५।७।६३ शुक्रवार ते मिति आषाढ व. १ दिनांक ७।७।६३ रविवार पावेतों तीन दिवस साजरा झाला.

यदाचे उत्सवास मुंबई, पुणे, मद्रास, म्हैसूर, नागपूर, खानदेश, वऱ्हाड, हैद्राबाद, मराठवाडा, वगैरे ठिकाठाहून भक्तलोक आले होते वरील सर्व ठिकाणी पाऊस फार असल्यानें गर्दी कमी प्रमाणात होती. मात्र पंढरपूर यात्रेकरु दर्शन घेऊन तावडतोब परत जाणारे बरेच होते.

उत्सवाकरिता मुद्दाम मांडव, ध्वजा तोरणें, पताका, कमानी वगैरे घालण्यात आले होते. तसेंच भक्तांना राहण्याच्या जागा डी. डी. टी. ने आरोग्य खात्यामार्फत स्वच्छ साफ सूप करून पिण्याचे पाण्यात औषध वगैरे टाकून आरोग्याबाबत व्यवस्था उत्तम ठेवण्यात आली होती, तसेंच जेवणाची, फराळाची व्यवस्था उत्तम ठेवण्यात आली होती. पोलीस बंदोबस्त जादा पोलीस मागवून उत्तम ठेवण्यात आला होता.

## उत्सवाचा कार्यक्रम

दिनांक ५।७।६३ शुक्रवार रोजी नित्य कार्यक्रमा व्यतिरिक्त श्रींचे मंदिरातून ( अखंड नाम २४ तास ) फोटोची मिरवणूक सकाळी ६ वाजता निघून ( गुरुपादुका ) वरून श्रींचे द्वारकामाई येथें भव्य चांदीचे सिंव्हासनात फोटोची स्थापना व २४ तास ( अखंड नाम सप्ताह ) व श्रीसाईचरित्र पारायण सकाळी ९ ते ११॥ पर्यंत श्रींचे जुन्या कापडाची ( लिलावरूपाने ) विक्री. दुपारी ४ ते ६ पर्यंत श्रीसाईभक्त माधवराव निमकर मुंबई यांचे कीर्तन. रात्रौ श्रींचे पालखीची गावातून मिरवणूक ( चौघडा ताशे, ब्यांड टाळ मृदंग भजनी दिंडीसह. )

दिनांक ६–७–६३ शनिवार रोजी नित्य कार्यक्रम व्यतिरिक्त द्वारकामाईत २४ तास नाम गजर सप्ताहाची मिरवणूकीनें समाप्ती ९ ते ११॥ पर्यंत पर्यंत श्रींचे जुने कापडाची ( लिलाव रूपाने ) विक्री दुपारी २ ते ३॥ पर्यंत संस्थानतर्फे श्रीसत्य-नारायण महापूजा तीर्थप्रसाद, दुपारी ४ ते ६ पर्यंत स. गवई विठ्ठलराव मराठे यांचे ( गुरु व सद्‌गुरु ) या विषयावर कीर्तन. रात्रौ श्रींचे रथाची गावातून मिरवणूक चौघडा ताशे, ब्यांड, टाळ मृदंग भजनासह. रात्रौ १० ते

रात्री १० ते पहाटे ६ वाजेपर्यंत (जागर) कलाकारांच्या हजेऱ्या. कलाकारात रायचूरचे प्रसिद्ध गवई श्री. माणिकराव रायचूर यांचे गायन फारच उत्तम झाले. पुण्याचे सनईवादनकार श्री. वसंतराव देवळकर, श्री, दामुअण्णा दळवी, श्री. मुरलीधर सोनवणे, नाशिक, श्री. पांडुरंग विडवे पुणे, श्री. राजाराम देशपांडे, पुणे (हार्मोनियम) वगैरे नामांकित कलाकार होते, सौ. नीला प्रभू मुंबई, श्री. आर. बी. सांडभोर पुणे, यांचा नकलाचा कार्यक्रम उत्तम झाला.

दिनांक ७।७।६३ रविवार रोजी नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त १० ते १२ पर्यंत मे. गवई विठ्ठलराव मराठे यांचे गोपाळकाला कीर्तन दहीहंडी उत्सव.

उत्सवानिमित्त भक्तांना तीन दिवस नेहमीचे दरात शिरा, जिलबी, लाडू, मिष्टान्न भोजन देण्यात आले. तसेंच उत्सवानिमित्त संस्थानचे सर्व नोकर सेवेकरांना एक दिवस मिष्टान्न भोजन व तीन दिवस चहाफराळ देण्यात आला. उत्सवानिमित्त साकोरी येथील कन्याकुमारी यांचें भजन झालें. तसेंच श्री. पंडित जगन्नाथ बुवा सुरतकर साकोरी यांचें शास्त्रीय गायन झालें. राष्ट्रीय संत श्री. तुकडोजी महाराज नागपूर यांच्या भजनाचा कार्यक्रम फारच उत्तम झाला.

येणेप्रमाणें गुरुपौर्णिमा उत्सव यंदाचे साली उत्तम रीतीने पार पडला. या उत्सवाची सर्व जबाबदारी मे. रिसीव्हरसाहेब यांनी देखरेख ठेवून चोख रितीने पार पाडली.


## ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

३६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २. टे. नं. २२८४४

तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण. होलसेल व रिटेलर्स



# जुलै १९६३

या महिन्यांत बाहेरगांवचें भक्त पावसाळा सुरू झाला म्हणून कमी प्रमाणात आले होते. कांही कलाकारानी श्रीपुढे हजेरी लावली. ती पुढीलप्रमाणे :—

**कीर्तन :—** श्रीसाईभक्त माधवराव निमकर, मुबई. श्री. ह. भ. प. मुळजीभाई केशवजी भानुशाली, मु. वाडा, जि. ठाणा. श्री. ह. भ. प. उत्तमराव महाराज, अनाथ आश्रम, मु. बोदवड, ता. भुसावळ, जि. जळगाव, पू. खा. स. गवई विठ्ठलराव मराठे याची या महिन्यात आषाढ शु. ११, आषाढ व. ११ श्रीसंत नामदेव पुण्यतिथी व गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त दोन कीर्तने अशी सहा कीर्तने झालीं.

**गायन :—** श्री. इंदुकात कृष्ण देशपांडे नासिक, श्री. हिरालाल जयस्वाल औरंगाबाद, श्री. एम. शोभादेवी रायचूर, श्री. कमलम्मा रायचूर, श्री. जगन्नाथबुवा सुरतकर. साकोरी, श्री. माणिकराव रायचूर.

**सनई वादन :—** श्री. मुरलीधर सोनवणे, श्री. वसंतराव देवळणकर, श्री. दासुअण्णा दळवी श्रीरामपूर, श्री. पाडुरंग दामोदर बिडवे पुणे.

**व्हॉयलिन वादन —** श्री. एस. जी. कुलकर्णी टिळकनगर ( बेलापूर )

**गीत रामायण :—** श्री. एस. एस. साठे मु. खडाळा ( बेलापूर )

आषाढ शु. ११ निमित्त गावांतून पालखीची मिरवणूक व कीर्तन.

**मोठ्यांच्या भेटी :—** ना. पी. के. सावंत गृहमंत्री ( महाराष्ट्रराज्य )

**हवा पाणी :—** शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाहीं.

## Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ( १ ) | श्रीसाईसच्चरित्र | ( मराठी ) | श्री. दाभोळकरकृत | ७–०० |
| ( २ ) | ,, | ( हिंदी ) | श्री. ठाकूर | ४–५० |
| ( ३ ) | ,, | ( गुजराथी ) | श्री. सोमपुरा | ३–७५ |
| ( ४ ) | ,, | ( इंग्रजी ) | Shri Gunaji | ४–०० |
| ( ५ ) | ,, | (Kannad) | N. S Anantha Raum | ३–०० |
| ( ६ ) | **Glimpes of Indian Spirituality** | | – by Pradhan | १–०० |
| ( ७ ) | **Glimpes of Indian Spirituality** | ( Telgu ) | | १–०० |
| ( ८ ) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २–०० |
| ( ९ ) | ,, | ( हिंदी ) | श्री. चिटणीस–दिल्ली | २–५० |
| (१०) | साईबाबा–अवतार व कार्य | ( मराठी ) | श्री. घोंड | २–०० |
| (११) | साईबाबांचे ४ अध्याय | ( मराठी ) | श्री. दासगणू | ००–५० |
| (१२) | सगुणोपासना | ( मराठी ) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१३) | ,, | ( गुजराथी लिपींत ) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१४) | श्री रुद्राध्याय ११ वा | ( मराठी ) | श्री. दाभोळकर | ००–१२ |
| (१५) | स्तवन–मंजरी | ( मराठी ) | श्री. दासगणू | ००–१३ |
| (१६) | श्री साई-सुमनांजली | ( मराठी १०८ नांवें ) | | ००–०६ |
| (१७) | कीर्तन पंचक | ( मराठी ) | श्री. देव | १–५० |
| (१८) | शीलधी | ( मराठी ) | डॉ. गव्हाणकर | ००–७५ |
| (१९) | श्री साईगीतांजलि | ( मराठी ) | कवि श्रीपाद | ००–१२ |
| (२०) | **Spiritual Symphony** | | by R. S. Harshid Mehta | २–५० |
| (२१) | **Side lights on Sai Baba** | ( Eng. ) | Calcutta | ००–७५ |
| (२२) | **Guide to Shirdi** | ( English ) | | ००–१२ |
| (२३) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | ( मराठी ) | | ००–२० |

### Colour pictures of S i Baba by Neroy

| | | |
|---|---|---|
| ( 1 ) | Baba sitting on Stone 15" × 20" Thick | 1–00 |
| ( 2 ) | ,, ,, ,, 9½" × 13½" medium | 00–37 |
| ( 3 ) | ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | 00–50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 37 nP. for No. 1 Postage Extra ( minimum purchase of Rs. 15 ). *Can be had from* ( मागवा ) :

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.

**Sai Baba Office 'Sai Niketan',**
Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

…क : श्री साईबाबा संस्थान, शिरडी, आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां
प्रकाशक : श्रीपाद बाळकृष्ण दर्प, मुंबई १४.



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते, त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते !

★

आणि म्हणूनच
हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स,
ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि
आणि त्याचप्रमाणें वैशिष्टयपूर्ण
सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सॅंडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई
टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनीं तयार केलेले श्री साईबाबांचें तीन रंगी चित्र, द्वारकामाई व इतर एक रंगी फोटो—साईज १० × ८, १० × १४, १४ × २० व पोस्टकार्ड साइज खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

श्री. सगुण मेरु नाईक
मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर

मुद्रक : कृ. ना. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक : ना. अ. सावंत, ईस्ट ॲन्ड वेस्ट इन्शुअरन्स बिल्डिंग, ४९/५५, आपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.